सोलापूर
Solapur Tarun Bharat
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, ०५ सप्टेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक १६४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

पोल्ट्री शेडसाठी ग्रामपंचायती मार्फत एकसमान कर आकारणी व्हावी : विखे-पाटील

मुंबई : कुक्कुटपालन करणाऱ्या व्यावसायिकांना पोल्ट्री शेडसाठी ग्रामपंचायतीमार्फत आकारण्यात येणारी कर आकारणी एकसमान करण्यात यावी. असे निर्देश राज्याचे महसूल, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आज येथे दिले.

ग्रामपंचायतीत वेगवेगळा कर आकारला जात असल्याने शेतकरी आणि कुक्कुटपालन व्यावसायिकांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागत होता. यासंदर्भात कुक्कुटपालन व्यावसायिकांनी महसूल व पशुसंवर्धन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन आपल्या अडचणी मांडल्या होत्या. आज मंत्रालयात श्री. विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीत श्री.विखे पाटील यांनी कर आकारणीतील विसंगती दूर करून एकसमान कर आकारणी करण्याचे निर्देश दिले आहेत. यामुळे कुक्कुटपालन व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

विखे-पाटील म्हणाले की, कुक्कुटपालन या शेतीपूरक व्यवसायामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक विकासास मदत होते. सर्व ठिकाणी एकसमान कर आकारणी झाल्यास कुक्कुटपालन व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना एक आधार मिळणार आहे.

कुक्कुटपालन व्यवसायासाठी स्वतःच्या शेतात उभारण्यात आलेल्या पोल्ट्री शेडसाठी राज्यातील विविध ग्रामपंचायतींमार्फत वेगवेगळी कर आकारणी होत आहे. शेतकऱ्यांना जोडधंद्यासाठी प्रोत्साहित करणे आणि शेतीपूरक व्यवसाय असल्याने कुक्कुटपालनास प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. कुक्कुटपालन व्यवसायाची मोठ्या उद्योगांशी तुलना करता येणार नाही. शेतकऱ्यांनी उभारलेल्या पोल्ट्री शेडसाठी मालमत्ता कराची आकारणी माफक पद्धतीने करण्याबाबत विचार करून राज्यातील सर्व ठिकाणी एकाच पद्धतीने कर आकारणी व्हावी. पशुसंवर्धन विभागाच्या वतीने यासाठी आवश्यक प्रस्ताव तयार करून ग्रामविकास विभागास पाठवावा. यामध्ये सुसूत्रता येण्यासाठी ग्रामविकास विभागाने कार्यवाही करावी, अशा सूचना ही यावेळी विखे-पाटील यांनी यावेळी दिल्या.

समलैंगिक संबंध ठरणार पुन्हा गुन्हा?

मेडिकल विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात मोठा बदल

मुंबई : नॅशनल मेडिकल आयोगाने वैद्यकीय विद्यार्थ्यांसाठी फॉरेन्सिक मेडिसिन अभ्यासक्रमात बदल केला आहे, समलैंगिकता आणि अनैसर्गिक लैंगिक संबंधांसारखे विषय पुन्हा सुरू केले आहेत. २०२२ मध्ये मद्रास हायकोर्टाच्या निर्णयानंतर अभ्यासक्रमात बदल केला होता. पण आता पुन्हा सुधारित अभ्यासक्रम सुरु केला आहे. यामध्ये हायमेनचे महत्त्व, कौमार्य आणि डिफ्लोरेशन व्याख्या आणि त्यांचे कायदेशीर परिणाम यासारख्या विषयांचा समावेश केला आहे, जे सर्वसमावेशक शैक्षणिक दृष्टिकोनाचा विचार करत पूर्वी काढून टाकण्यात आले होते.

२०२२ मध्ये, मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्देशांना प्रतिसाद म्हणून, एका तज्ञ समितीने विद्यार्थ्यांना हायमेन चाचणीसारख्या चाचण्यांच्या अवैज्ञानिक स्वरूपाबद्दल शिक्षित करण्यासाठी कौमार्य संबंधित संकल्पना अभ्यासक्रमातून काढून टाकण्याची शिफारस केली होती. त्या वर्षी, विद्यार्थ्यांना लिंग, लिंग ओळख आणि लैंगिक अभिमुखता अधिक व्यापकपणे समजून घेण्यास मदत करण्यासाठी मानसोपचार अभ्यासक्रम शिकवण्यात आला होता. पण अलीकडील बदलांमध्ये मानसोपचार अभ्यासक्रमातील लिंग आणि लिंग ओळख यांच्यातील फरक यासारख्या विषयांचा समावेश नाही

इस्त्रायलला होणारा शस्त्र पुरवठा थांबवा;याचिका दाखल

नवी दिल्ली: हम्मासच्या दहशतवाद्यांशी संघर्षरत असलेल्या इस्त्रायलला भारताकडून होणारा शस्त्र पुरवठा थांबवण्यात यावा. तसेच शस्त्रास्त्र पुरवठा करणाऱ्या भारतीय कंपन्यांचे परवाने रद्द करावे अशी मागणी करणारी जनहित याचिका आज, बुधवारी सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली.

चितेगावात २६ कोटी रुपयांची जीवन प्राधिकरण विभागाची पाणीपुरवठा योजना अस्तित्वातच नाही; चौकशीची मागणी

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि ४ सप्टेंबर (अरुण देविदास) पैठण तालुक्यातील चितेगाव ग्रामपंचायत नेहमी कोणत्या ने कोणत्या कारणाने नेहमी चर्चात असलेले ग्रामपंचायत या ग्रामपंचायत अंतर्गत एमआयडीसी मुळे कामगाराची वसाहत म्हणून ओळख असलेल्या चितेगाव येथे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग अंतर्गत गेल्या दोन वर्षापासून २६ कोटी रुपयाची योजना हरवल्याचा प्रकार व योजना ग्रामपंचायतला हस्तांतर झाल्याचा बनावट प्रकरण उघड पडले असून. ग्रामीण भागात सर्व नागरिकांना स्वच्छ पाणी उपलब्ध व्हावा यासाठी यासाठी राज्य शासन पाणीपुरवठा संदर्भात वेगवेगळ्या योजना राबवीत असतानाच पैठण तालुक्यातील चितेगाव येथे सन २०१७-२०१८ या कालावधीमध्ये महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागांतर्गत जलस्वराज टप्पा क्र. २ ही २६ कोटी रुपयांची योजना प्राधिकरण विभागाने संबंधित चितेगाव गावात राबविण्यासाठी मंजुरी देऊन सदरची योजना ठेकेदाराला दोन वर्षात काम पूर्ण करण्याच्या अटी शर्तीवर कामाचा कार्यरंभ आदेश दिला. परंतु गेल्या दोन वर्षापासून या गावामध्ये पाणीपुरवठा योजनेचे कुठलेही काम अस्तित्वात नसल्याचा प्रकार उघडा पडला असून.

गेल्या दोन वर्षापासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाकडून २६ कोटी रुपयांची योजनेच्या कामाची मुदत संपली असली तरीही योजनेचे काम झालेच नाही या गावात पाणीपुरवठा योजना अस्तित्वातच नसल्याचा प्रकार समोर आल्यामुळे. आज या गावातील महिला व नागरिकांना छत्रपती संभाजीनगर येथे जाणाऱ्या पाणीपुरवठा करणाऱ्या लिकीज पाईपलाईनमधून पिण्याचं पाणी आणण्याची वेळ आली असून.या योजनेची चौकशी करण्याची मागणी विरोध पक्षनेते अंबादास दानवे व महाराष्ट्र जीवन प्राधिकाने विभागाचे मुख्य अभियंता यांच्याकडे येथील नागरिकांनी तक्रार केली आहे.

सदरील चितेगाव येथील २६ कोटी रुपयाची योजना ग्रामपंचायत चितेगाव ता.पैठण यांच्याकडे हस्तांतर झाल्याचा खुलासा प्राधिकरण विभागाने केला. या सर्व प्रकारामुळे हस्तांतर पत्रावर ग्रामविकास अधिकारी मतसागर यांच्या बनावट सही वापरून योजना ग्रामपंचायतकडे हस्तांतर झाल्याचा प्रकार उघड झाला योजना हस्तांतर विषय चितेगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात प्राधिकरण विभागाकडून सदरील पाणीपुरवठा योजना हस्तांतर झालेच नसल्याचे लेखी खुलासा पत्र चितेगाव ग्रामपंचायत विभागाने प्राधिकरण कार्यालयात सादर केला आहे. यामुळे या ग्रामपंचायत कार्यालयात या योजने संदर्भात कुठलीही माहिती नसल्याचे विद्यमान सरपंच कृष्णा गिधाने यांनी संबंधित विभागाला लेखी पत्र देऊन कळविले असल्याची माहिती दिली आहे.

योजना अस्तित्वात नसल्याने येथील महिला व नागरिकांना मात्र छत्रपती संभाजीनगर येथे जाणाऱ्या पाणीपुरवठा लिकीज पाईपलाईन मधून पाणी आणण्याची वेळ आली आहे. या योजनेच्या कामाविषयी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या अधिकाऱ्यांनी हातवर केल्याची भूमिका घेऊन सदरील योजना चितेगाव येथील ग्रामपंचायतला हस्तांतर असल्याबाबतच्या दस्तावेजवर ग्रामसेवक यांच्या बनावट सह्यांचा वापर करून सदरील योजनेची संपूर्ण जबाबदारी चितेगाव ग्रामपंचायतला हस्तंतर केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या सर्व बनवाबनवी योजनेतील प्रकार चितेगाव येथील भाऊसाहेब पाचरणे व नागरिकांनी थेट संबंधित प्राधिकरण विभागाचे अधीक्षक अभियंता यांच्याकडे तक्रार दाखल केल्यामुळे. संबंधित प्राधिकरण विभागाचे कार्यकारी अभियंता दीपक काळे यांनी दि.१९/८/२०२४ रोजी या योजनेची चौकशी करण्याचा आदेश दिला. परंतु या प्राधिकरण विभागाचे कुठलेही अधिकारी चौकशीसाठी या गावात आलेली नसून त्यामुळे या बनवाबनवी पाणीपुरवठा योजनेत काहीतरी

अजित पवार यांना 'ब्रॉन्कायटीस'चा त्रास; डॉक्टरांकडून विश्रांतीचा सल्ला!

मुंबई : उपमुख्यमंत्री अजित पवार यांना 'ब्रॉन्कायटीस'चा त्रास होत असून डॉक्टरांनी त्यांना विश्रांतीचा सल्ला दिला आहे. यामुळे लातूर जिल्ह्यातील उदगीर येथे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमांना उपमुख्यमंत्री अजित पवार उपस्थित राहू शकणार नाहीत. याबाबत राष्ट्रपती महोदयांच्या कार्यालयाला अवगत करण्यात आले आहे, असे उपमुख्यमंत्री कार्यालयाच्या वतीने कळविण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार हे मागील काही महिन्यांपासून जनसन्मान यात्रा, 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेच्या लाभार्थ्यांची भेट, शासकीय बैठका, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यक्रमांच्या निमित्ताने सातत्याने राज्यातील विविध भागांचा दौरा करत आहेत. आज त्यांचा राष्ट्रपती महोदयांसोबत उदगीरचा दौरा होता. परंतु 'ब्रॉन्कायटीस'चे निदान झाल्याने उपमुख्यमंत्र्यांना त्यांचा उदगीर दौरा रद्द करावा लागत आहे.

महिला सक्षमीकरणाचा महाराष्ट्र नवा आदर्श - राष्ट्रपती

लातूर, ४ सप्टेंबर : राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांच्यासह अनेक महनीय महिलांनी महाराष्ट्रात सामाजिक प्रगतीचा पाया घातला आहे. त्याच राज्यात शासनाने आता महिला आर्थिक सक्षमीकरणासाठी दमदार पावले उचलून त्यांच्या स्वावलंबन, निर्णय शक्तीत वाढ केली आहे. महाराष्ट्राने महिला सक्षमीकरणाचा नवा आदर्श देशापुढे ठेवला आहे, अशा शब्दांमध्ये देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसह सुरु असलेल्या आर्थिक विकासाच्या निर्णयाचे कौतुक केले आहे.



सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

एकही बाधित व्यक्ती पंचनामा पासून वंचित राहता कामा नये - पालकमंत्री अब्दुल सत्तार

तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देश

सिल्लोड / कन्नड (प्रतिनिधी) दि. ३, जिल्ह्यात गेल्या दोन दिवसात झालेल्या अतिवृष्टीत मोठ्या प्रमाणावर नदी-नाले काठावरील गावे, शेतीपिकांचे आणि रस्ते, पूल बाधित झाले आहेत. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने योग्य समन्वय ठेवून तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे पूर्ण करावेत. यामध्ये एकही बाधित व्यक्ती पंचनामा पासून वंचित राहता कामा नये, असे निर्देश अल्पसंख्यांक विकास, औकाफ, पणन मंत्री तथा पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी जिल्हा प्रशासनाला दिले.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड , कन्नड तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची पालकमंत्री ना. अब्दुल सत्तार यांनी पाहणी करून प्रत्यक्ष आढावा घेतला. पालकमंत्र्यांनी सिल्लोड तालुक्यातील भराडी, बोरगाव बाजार, बोरगाव सारवणी तर कन्नड तालुक्यातील नाचनवेल, पिशोर, रामनगर, साखरवेल, वासडी, महेगाव हस्ता, पळशी खुर्द शिवारात बाधित भागाचा दौरा करून येथील नुकसानग्रस्तांशी संवाद साधत त्यांना धीर दिला. सद्यस्थितीत प्रमाणापेक्षाही जास्त नुकसान झाले असून, जिल्ह्यातील नदी-नाले काठावरील शहरी आणि ग्रामीण भागाला याचा मोठा फटका बसला आहे. ग्रामीण भागातील शेतीपिकांसह गुरे-ढोरे, पशुधन, दुभती जनावरे वाहून गेली आहेत. पुराच्या पाण्याने रस्ते आणि पुलांचे भाग तुटल्यामुळे गावांचा संपर्कही तुटला आहे. त्यामुळे तो तातडीने पूर्ववत करण्याचे निर्देश पालकमंत्री श्री. सत्तार यांनी जिल्हा यंत्रणेला दिले. याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा गाढे, शिवसेना जिल्हाप्रमुख भरतसिंग राजपूत , सिल्लोड कृउबा समितीचे सभापती केशवराव तायडे, कन्नड शिवसेना तालुकाप्रमुख केतन काजे, कन्नड गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकने यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

यश शहा यांची नियुक्ती

अहमदनगर : महाराष्ट्र शासनाच्या भगवान महावीर स्वामी निर्वाण कल्याण महोत्सव जिल्हा समितीच्या अशासकीय सदस्यपदी येथील इंजि. यश प्रमोद शहा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ना. मंगलप्रभात लोढा यांच्या सूचनेनुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. २४ वे जैन तीर्थंकर भगवान महावीर स्वामींच्या २५५० व्या महानिर्वाण कल्याण महोत्सवानिमित्त ना. मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली संपूर्ण राज्यात जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्यात आले आहे. त्यानुसार पार्श्वनाथ कन्स्ट्रक्शन व इंटेरियरचे संचालक इंजि. यश शहा यांची अहमदनगर जिल्ह्यासाठी नियुक्ती करण्यात आली आहे. इंजि. यश शहा हे जैन समाजाच्या विविध संघटनांवर पदाधिकारी म्हणून सक्रियपणे कार्यरत आहेत. त्यांच्या या नियुक्तीबद्दल जैन साधू - साध्वी तसेच ललित गांधी, संदीप भंडारी, राजेंद्र शहा, पलक शहा तसेच समाज बांधवांनी अभिनंदन केले आहे.

एसएमएफजी इंडिया क्रेडिटद्वारे १०००व्या शाखेचा आरंभ

मुंबई : एसएमएफजी इंडिया क्रेडिट कं. लि., भारताची गैर-बँकींग वित्तीय कंपनी (एनबीएफसी) क्षेत्रातील एक प्रमुख कंपनी असून, त्यांनी वाशी, नवी मुंबई इथे आपल्या १०००व्या शाखेच्या आरंभाची घोषणा केली आहे. या लक्षणीय प्रसंगामुळे देशभरातील आपला विस्तार करण्यामागील आणि अद्याप शिरकाव न झालेल्या बाजारपेठांपर्यंत वित्तीय सेवा पोहोचवण्यातील कंपनीची अढळ निष्ठा दृग्गोचर झाली आहे. या लक्षणीय मैलाच्या टप्प्याच्या निमित्त, एमएमएफजी इंडिया क्रेडिटनं इंडिया पोस्टसोबत सहयोग करुन एक विशेष आवरण आणि माय स्टँप प्रकाशित केले. या अधिकृत अनावरण प्रसंगी श्री. योगी कोजी, कॉन्सुल-जनरल, जपानचे मुंबईतील कॉन्सुलेट-जनरल, श्री. अभिजीत बनसोडे, संचालक - टपाल सेवा (मुख्यालय) महाराष्ट परिमंडळ, सोबत श्री. शांतनु मित्रा, सीईओ आणि एमडी, एसएमएफजी इंडिया क्रेडिट हे मान्यवर उपस्थित होते.

गणेश चतुर्थीच्या उत्सवात टिकाऊपणावर भर

गणेश चतुर्थी एक अत्यंत उत्साहाने, हर्षोल्लासाने साजरा होणारा सण आहे. सुखकर्ता आणि विघ्नहर्ता गणेश ही हुशारी आणि बुद्धीची देवता आहे. या सणाच्या निमित्ताने भक्तगण आणि समुदाय एकत्र येतात त्यामुळे सणाचा आनंद साजरा करताना चांगल्या प्रथा अंगिकारणे आवश्यक आहे. या वर्षी, सोनी सबचे कलाकार इको-फ्रेंडली गणेश मूर्तीचा आणि गणेश उत्सवातील चांगल्या सवयींचा पुरस्कार करत आहेत.समस्त 'श्रीमद् रामायण'च्या टीमच्या वतीने मी सर्वांना गणेश चतुर्थीच्या शुभेच्छा देतो. मुंबई लहानाचा मोठा झाल्यामुळे गणेश चतुर्थीचा सण माझ्यासाठी खूप खास आहे. मात्र उंबरगाव येथे शूटिंग सुरू असल्याने यंदा गणेश चतुर्थीला मी मुंबईत असणार नाही. पण बाप्पाचे आशीर्वाद घेण्यासाठी मी जवळपासच्या एखाद्या गणेश मंडपात दर्शनास जाईन.

मुद्रेक्स गुंतवणूकदारांच्या संरक्षणासाठी कायदेशीर लढा देणारा पहिला क्रिप्टो प्लॅटफॉर्म बनला

मुंबई - मुद्रेक्स हा एक जागतिक क्रिप्टो इन्व्हेस्टमेंट प्लॅटफॉर्म आहे, ज्याने फसवणूक करणाऱ्या वेबसाइट्सच्या नेटवर्कविरुद्ध कोर्टात आपल्यासाठी आदेश मिळवला आहे, ज्या वेबसाइट्सने लोकांची फसवणूक करण्यासाठी मुद्रेक्सच्या ट्रेडमार्कचा अवैधपणे वापर केला होता. दिल्ली उच्च न्यायालयाने माननीय न्यायमूर्ती, सुश्री मिनी पुस्कर्णा यांच्या अधिपत्याखाली, २३/०८/२०२४ रोजी त्या ३८ वेबसाइट्स त्वरित हटवण्याचे निर्देश दिले, ज्यांनी घोटाळे करण्यासाठी आणि गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यासाठी मुद्रेक्सच्या ब्रँड नावाचा दुरुपयोग केला होता.

डायसन तर्फे महाराष्ट्रातील मोठ्या डेमो स्टोअरची सुरुवात

छत्रपती संभाजीनगर : डायसन या जागतिक स्तरावरील तंत्रज्ञान कंपनी तर्फे आज त्यांच्या महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या डेमो स्टोअरची सुरुवात पुण्यात केल्याची घोषणा केली. शहरातील आघाडीचे शॉपिंग स्थळ असलेल्या फिनिक्स मॉल ऑफ दि मिलेनियम येथे हे डायसनचे डेमो स्टोअर असून यामध्ये ग्राहकांना डायसनच्या सर्व उत्पादनांसह तंत्रज्ञानाची माहिती घेणे शक्य होणार आहे. या स्टोअर मध्ये ग्राहकांना डायसन व्हॅक्युम्स सह विविध मजल्यांसह डेब्रीज (सिरीयल्स पासून आणि विविध प्रकारची धूळ) याच्या सह ' रिअल लाईफ' सेटिंग्ज असून यामध्ये हवेची गुणवत्ता यांची माहिती रिअल टाईम पध्दतीने मिळू शकेल. त्याच बरोबर डायसन स्टायलिंग स्टेशन्स मध्ये खरेदीदारांना अत्याधुनिक डायसन ब्युटी टेक्नॉलॉजीज सह केसांची स्टाईल पाहता येऊ शकेल. त्याच बरोबर डायसनच्या ऑडिओ विभागाचा विशेष झोन असून ग्राहकांना आता डायसनच्या हाय फिडिलिटी हेडफोन्सचा अनुभव घेऊन ते खरेदी करणे शक्य होणार आहे.

धनराज वाघ यांचे निधन

सोयगाव,दि.४ सप्टेंबर : सोयगाव तालुक्यातील कंकराळा येथील धनराज रामकृष्ण वाघ (वय.५८) यांचे रविवारी रात्री एक वाजता हृदय विकाराच्या झटक्याने निधन झाले.त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले,सुना,नातवंडे एक मुलगी,पाच भाऊ,तीन बहिणी, असा परिवार आहे.सोमवारी दुपारी एक वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.जरंडी येथील डॉ.जीवराम वाघ यांचे ते भाऊ होते.

विमलबाई जाधव यांचे निधन

सोयगाव,दि.४ सप्टेंबर - तालुक्यातील डाभा येथील विमलबाई कैलास जाधव (वय.७५) यांचे बुधवार रोजी सकाळी ७:०० वा.अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवार रोजी दुपारी २:०० वा.डाभा ता.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात दोन मुले,सुना,नातवंडे,असा परिवार आहे. संदिप जाधव,प्रदिप जाधव यांच्या त्या मातोश्री होत.

एस. टी. कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या धरणे आंदोलनामुळे बस सेवा ठप्प

खाजगी वाहनाने करावा लागत आहे प्रवास

तभा वृत्तसेवा

गंगापूर दि.४ सप्टेंबर : एस टी महामंडळ कर्मचाऱ्यांनी पुकारलेल्या धरणे आंदोलनाचा पहिल्याच दिवशी वाहतुकीवर परिणाम झाला.बसने प्रवास करणाऱ्या प्रवाशांना खाजगी वाहनाने प्रवास करावा लागत आहे. मंगळवारी गंगापूर आगारातून कोणतीही बस फेरीसाठी निघाली नाही त्यामुळे बस स्थानकात शुकशुकाट झाला आहे.

एस टी महामंडळाच्या विविध कर्मचारी संघटनेने पुकारलेल्या धरणे आंदोलनात शासनाकडून विविध मागण्यांची पूर्तता करण्यात यावी अशी मागणी यावेळी करण्यात आलेली आहे. काय आहेत मागण्या : राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे रा.प. कामगारांना वेतन देण्यात यावे, महागाई भत्याची माहे जुलै, २०१८ ते जानेवारी, २०२४ या कालावधीची थकबाकी अद्याप रा.प. कामगारांना मिळोललली नाही. सदरची सर्व थकबाकी कामगारांना त्वरीत मिळणे आवश्यक आहे.शासकीय कर्मचा-यांप्रमाणे घरभाड़े भता व वार्षिक वेतनवाढीचा दर रा.प. कामगारांना लागू करण्याची कामगार करारात तरतुद असतानाही त्यामध्ये प्रशासनाने घरभाडे भत्याचा दर ८,१६,२४ टक्क्याऐवजी ,१४,२१ टक्के व वार्षिक वेतनवाढीचा दर ३ टक्क्याऐवजी २ टक्के असा एकतर्फी कमी करून कामगार कराराच्या तरतुदीचा भंग केलेला आहे. याबाबत रा.प.प्रशासनाकड़े वारंवार पाठपुरावा केल्यानंतर प्रशासनाने घरभाडे भत्याचा दर शासकीय दरानुसार ८, १६,२४ टक्के माहे ऑक्टोबर २०२१ पासून व वार्षिक वेतनवाढीचा दर ३ टक्के माहे नोव्हेंबर २०२१ पासून स.प. गजगगारांना लाग गेता परंतु माहे एप्रिल २०१६ ते ऑक्टोबर कालावधीची वेतनाची च त्याची थकबाकी रा.प. कामगारांना अद्याप मिळालेली नाही ती त्वरीत देण्यात यावी.सन २१६-२०२० या कालावधीशाठी वेतनवाढीपोटी रू. ४८४९ कोटी जाहिर केले, सदर रु.४०४२ कोटीचे पुर्ण वाटपही झालेले नाही . तरी ४८४९ कोटी मधील शिल्लक रकमेचे कामगारांना वाटप करण्यात यावे. एस.टी. कामगारांचे वेतन इतर महामंडळाच्या तुलनेत कमी आहे ही बाब विचारात घेऊन शासनाने कामगारांच्या सेवा कालावधीनसार त्यांच्या मूळ वेतनात माहे नोव्हेबर २०२१ पासून अनुक्रमे रु. ५०००/, र. ४०००/- व रु. २१००/- वाढ करण्यात आली. परंतु अशी वाढ दैताना सेवाजेष्ठ कामगारांच्या मुळ वेतनात मोठ्या प्रमाणात विसंगती निर्माण झालेल्या आहेत.

सदरच्या विसंगती दूर करण्यासाठी सर्वच कामगारांना सरसकट रु.१०००/- लागू करण्यात यावेत.सध्या एस.टी. कामगारंना लागू असलेन्या वैद्यकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीच्या योजनेफवजी कॅशलेस योजना (इनडोर/आऊटडोर) एस. टी. कामगारांना लागू करण्यात यावी. एस.टी. कामगारांना व त्यांच्या कुटुंबियांना सर्व प्रकारच्या एस. टी. बसेसमध्ये मोफत पासाची सवलत फरक न भरता लागू करण्यात यावी. तसेच सेवानिवृत एस.टी. कामगारांना ६ महिन्याऐवजी १ वर्षाचा मोफत पास सर्व प्रकारच्या एस.टी. बसेसमध्ये उपलब्ध करून देण्यात यावा.या मागण्या करण्यात आल्या आहेत.

पर्युषण पर्वाच्या पाचव्या दिवशी भगवान महावीर जन्म कल्याणक निमित्त धार्मिक कार्यक्रम आयोजन

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी - वर्धमान जैन सेवा संघ, सिडको तर्फे शनिवार दि. ३१ ऑगस्ट ते ०८ संप्टेबर या दरम्यान श्री शंखेश्वर पार्श्वनाथ जैन जिनालय प्रागणात पर्युषण महापर्व आराधने चे आयोजन करण्यात आले आहे.

भगवान महावीर जन्म कल्याणक निमित्त पर्युषण पर्वाच्या पाचव्या दिवशी श्री शंखेश्वर पार्श्वनाथ जैन जिनालयामध्ये सकाळी ६.०० वाजता शहनाई वादन, सकाळी ६.३० वाजता श्री शंखेश्वर पार्श्वनाथ भगवान, आदेश्वर भगवान, कुंथुनाथ भगवान, शांतीनाथ भगवान, मुनि वत स्वामी भगवान, महावीर स्वमी भगवान, गौतम स्वामी, सरस्वती माता, पद्मावती माता, मणिभद्रवीर स्वामी आदि भगवतांचा अभिषेक आयोजित करण्यात आला आहे. सकाळी ७.०० ते ८.०० वाजेपर्यंत संगीतमय स्नात्र पुजा केलि जाइल. सकाळी ८.०० वाजता भगवतांची आरती करण्यात येणार आहे. संध्याकाळी ६.३० वाजता प्रतिकमण होणार.

सायंकाळी ७.३० वाजता श्री शंखेश्वर पार्श्वनाथ जैन जिनालय प्रांगणात भगवतांचा पाळना व् माता त्रिशाला आलेल्या चौदा स्वप्न भाविकांच्या दर्शानासाठी सुंदर अशी सजावट करूण ठेवण्यात येणार आहे. या प्रसंगी नवसारी येथील सुप्रसिध्द जैन संगीतकार आकाश शहा यांच्या भक्तीगीतांच्या कायक्रमात वीर झूले त्रिशाला झुलावे या विषयावर नवीन भक्तीगीत प्रस्तुत करनार आहे. भक्तीसंध्या मध्ये (३ ते १० वर्ष) बालक बालीकांसाठी स्व. कचरुलालजी मुथा, स्व. सुरजदेवी मुथा यांच्या स्मरणार्थ अनिल मुथा, डॉ. संदिप मुथा (जालनावाले) मुथा मोटर्स तर्फे भेटवस्तु देण्यात आली. भक्तीसंध्येत लकी ड्रा चे आयोजन करण्यात आले होते. सौ.विद्या प्रफुल बाफना व आ.अतुल सावे या गुरूभक्त परिवारा तर्फे विजेत्यांना विशेष पारितोषिक देण्यात येणार आहे. या प्रसंगी सौ. मनिषा संजय भंसाली परिवारा तर्फे सजावट व्यवस्था व रतिलाल प्रविनकुमार मुगदिया (नम्रता ग्रुप) परिवारा तर्फे प्रभावणा देण्यात येणार आहे. त्यानंतर रात्री १०.०० वाजता श्री. शंखेश्वर पार्श्वनाथ भगवान, भगवतांचा आरती व मंगलदिवा तसेच मणिभद्रवीरची आरती, पद्मावती माताजींची आरती चे चढावे होणार आहे. दि. ०६ संप्टेबर शुक्रवार रोजी कुमारपाल महाराजा हस्ते महाआरती संपन्न होणार आहे. पर्युषण महार्वाच्या अंर्तगत प्रतिकमणची व्यवस्था सायंकाळी ६.३० वाजता अहिंसा भवन, सिडको एन ३ मध्ये करण्यात आली आहे.

पर्युषण महापर्व आराधने अंर्तगत आयोजीत सर्व कार्यक्रमास सकल जैन बांधवानी जास्तीत जास्त संख्येत उपस्थित राहावे असे आव्हान गुरू गौतम श्री श्वेतांबर वर्धमान जैन सेवा संघ तर्फे करण्यात आले आहे.

सोयगाव येथे गणेशोत्सव निमित्ताने शांतता कमिटीची बैठक संपन्न शांततेची परंपरा कायम राखत प्रशासनाला सहकार्य करा - डॉ.दिनेशकुमार कोल्हे

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.४ सप्टेंबर

यावर्षी गणेशोत्सव मोठ्याप्रमाणात उत्साहात साजरा केला जाणार असल्याचे सुतोवाच असुन गणेशोत्सवात सामाजिक,धार्मिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरे करावेत मात्र याचवेळी सोयगावकरांनी शांततेची परंपरा कायम राखावी कुठलेही गालबोट लागु देऊ नये उत्सव शांततेत साजरा करून प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.दिनेशकुमार कोल्हे यांनी दि.३ मंगळवार रोजी सोयगाव पोलीस स्टेशन येथे आयोजित शांतता कमिटीच्या बैठकीत केले.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोयगाव पोलीस स्टेशनचे सपोनि. पंकज बारवाल यांनी सोयगाव येथे शांतता कमिटीची बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी उपस्थित होते.याप्रसंगी मार्गदर्शन करताना ईश्वर चौधरी बोलत होते,गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याकरीता पोलीस अधिक्षक छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण) यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार विविध सुचना करताना जबरदस्तीने कोणाकडुनही वर्गणी मागु नये,सर्व नियम कायद्यांची माहिती देऊन सोशल मिडीयावर आक्षेपार्ह पोष्ट दिसुन आल्यास कायदा हातात न घेता पोलीसांकडे संपर्क साधावा,महिलांना सन्मानाची वागणूक द्यावी,ईतर स्वच्छतेबाबत काळजी घेतानाच ध्वनी प्रदुषणाबाबतही काळजी घ्यावी तसेच मंडळाचे ठिकाणी दाखविण्यात येणारे देखावे आक्षेपार्ह अगर सामाजिक तेढ निर्माण होणार नाही याची काळजी घ्यावी तसेच गणेशमंडपामुळे रहदारीस अडथळा होणार नाही,गणेश मंडळाचे ठिकाणी स्वयंसेवक नेमुन मंडळांच्या पदाधिका-यांनी त्यावर नियंत्रण ठेवावे.आदि सुचना करण्यात आल्या याचवेळी पदाधिका-यांनी मांडलेल्या समस्या संदर्भात माहिती घेऊन आवश्यक उपाययोजना बाबत सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.यावेळी बैठकीत सोयगाव पोलीस स्टेशनचे सफौ. दिलीप पवार,राजू बरडे,गजानन दांडगे,रवींद्र तायडे,पवन तायडे,अजय कोळी,विनोद सपकाळ,पोलीस पाटील अंबादास ढगे,बाली चव्हाण,नाना चौधरी,श्रीराम जाधव,मुलचंद पवार,सोयगाव शहरातील नगरसेवक हर्षल काळे,नगरसेवक संदीप सुरडकर,राजू माळी,कृष्णा जुनघुरे पाटील,रवींद्र जावळे,अर्जुन गुजर,राहुल पवार,ईश्वर राठोड, श्रीराम जाधव,प्रदिप जोहरे, मंगलदास अहिरे,ओम बावस्कर,अतुल चौधरी,किरण महाले,तेजस काळे,महेश पवार,चेतन पवार,गोपाल पवार,निलेश नागपुरे,वैभव लवटे, आदिंसह गणेश मंडळाचे अध्यक्ष,उपाध्यक्ष पदाधिकारी,उपस्थित होते.

कोष वाङ्मयाची विश्वासार्हता अधिक असल्याने त्याचा अवलंब करावा : प्रा. ज्योती स्वामी

'वाचनकट्टा' उपक्रम उत्साहात

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी - मराठी भाषेत कोष वाङ्मयाची समृद्ध परंपरा आहे. कोष हे माहिती आणि ज्ञानाचे महत्वाचे स्रोत आहेत. गुगल, विकीपीडिया आणि यू-ट्यूब या माध्यमातूनही जगातल्या बहुतांश विषयांची क्षणार्धात माहिती मिळते. तरीही कोष वाङ्मयाची विश्वासार्हता अधिक आहे. त्यामुळे आपण त्याचा उपयोग केला पाहिजे, असे प्रतिपादन 'वाचनकट्टा' उपक्रमाच्या कार्यक्रमात बोलताना प्रा. ज्योती स्वामी म्हणाल्या.

संत ज्ञानेश्वर महाविद्यालय कै. बाबूराव काळे मराठी स्कूल आणि जिल्हा परिषद प्रशाला, सोयगाव यांचा वाचनकट्टा हा संयुक्त उपक्रम

आहे. या कार्यक्रमाच्या पहिल्या सत्रात व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. शिरीष पवार, प्रमुख अतिथी उपप्राचार्य डॉ. आर. के. बारोटे, कै. बाबुराव काळे मराठी स्कूलचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलीस, जिल्हा परिषद प्रशालेचे मुख्याध्यापक राठोड आणि प्रा. भारती पाटील उपस्थित होते.

'वाचनकट्टा' उपक्रमाचे हे तिसरे वर्ष आहे. या उपक्रमाअंतर्गत प्रत्येक महिन्याला एक कार्यक्रम राबवला जातो. ऑगस्ट महिन्याच्या उपक्रमाचे दोन सत्रांमध्ये आयोजन करण्यात आले होते. पहिल्या सत्रात कोशवाङ्मय परिचय व प्रदर्शन तर दुसऱ्या सत्रात अभिवाचन कार्यशाळा घेण्यात आली. प्रमुख मार्गदर्शक प्रा. ज्योती स्वामी यांनी पहिल्या सत्रात कोष वाङ्मय म्हणजे काय? त्याचे प्रकार, महत्व आदी विषयी माहिती दिली.

अभिवाचन म्हणजे काय ? त्याची कार्यशाळा कशासाठी घेत आहोत, हे स्पष्ट केले.

पहिल्या सत्राचा अध्यक्षीय समारोपात करताना प्राचार्य डॉ शिरीष पवार यांनी विद्यार्थ्यांना सांगितले, ग्रंथाचे, कोशांचे वाचन करा, माहिती आणि ज्ञान मिळवा. साहित्याच्या विविध प्रकारांचे अभिवाचन करा. या सर्वांचा तुमच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपयोग करून घ्या.

दुसऱ्या सत्ररमध्ये अभिवाचन कार्यशाळेत, प्रा. ज्योती स्वामी यांनी अभिवाचनात भाषेचे महत्व, वैशिष्ट्येआणि चिन्हांचे महत्व तसेच वाचन स्वर, सादरीकरणाचे शिष्टाचार आणि ध्वनिक्षेपक वापरण्याची पद्धत आदी विषयावर सखोल मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन दौलतसिंग परदेशी यांनी तर आभार मनीषा देसाई यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती निर्मला बोराडे, श्रीमती मनिषा देसाई, श्रीमती वाघ, सोळंके सुनील आणि परमेश्वर हुसरे यांनी काम केले.

अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या भागात शेतकऱ्यांचे तत्काळ पंचनामे करा

माजी आ. नितीन पाटील यांनी दिले निवेदन

तभा वृत्तसेवा

कन्नड :-दि.०५ सप्टेंबर - तालुक्यात अतिवृष्टीमुळे अनेक भागात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असुन नुकसानग्रस्त भागाचे तत्काळ पंचनामे करावे या मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अजित पवार गटाचे माजी आमदार नितीन पाटील यांनी तहसीलदार विद्याचरण कडवकर यांना दिले. निवेदनात म्हटले आहे की कन्नड तालुक्यात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झालेली आहे,तालुक्यात ३८ हजार हेक्टरवरील पिकांना या अतिवृष्टीमुळे फटका बसला आहे त्यात मक्का,कापूस,सोयाबीन, अद्रक,आणि पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे

सदर नुकसानग्रस्त भागाचा तत्काळ पंचनामा करण्यात यावा अशी मागणी निवेदनात केली आहे निवेदनावर,माजी आमदार नितीन पाटील, खरेदी विक्री संघ सभापती सुरेश डोळस,फेडरेशन मुंबई संचालक पांडुरंग घुगे,कृ.उ.बा.समिती संचालक कैलास अकोलकर,राष्ट्रवादी कॉग्रेस पार्टी विधानसभा अध्यक्ष कल्याण पवार,शहराध्यक्ष अहेमद अली,संजय कवडे,पंढरीनाथ गायके, प्रल्हाद थोरात,कृष्णा कवडे,केशवराव पवार,सुनील निकम,प्रकाश काचोळे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

महेंद्र गंधे यांची देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून कौतुकाची थाप

नगर - नुकत्याच झालेल्या अखिल भारतीय देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळाच्या झालेल्या निवडणुकीत अध्यक्षपदी भारतीय जनता पार्टीचे नगर शहर विधानसभा निवडणूक प्रमुख महेंद्र गंधे हे बिनविरोध निवडून आले आहेत. या पार्श्वभूमीवर संस्थेचे सभासद आलेले राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची श्री. गंधे यांनी मुंबई येथे सागर बंगल्यावर सहपरिवार भेट घेतली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल महेंद्र गंधे यांचे अभिनंदन करून कौतुकाची थाप दिली. यावेळी सौ.मीनल गंधे, मल्हार गंधे व ॲड. ऋग्वेद गंधे उपस्थित होते.यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महेंद गंधे यांची ब्राह्मण समाजच्या राष्ट्रीय संघटनच्या अध्यक्षपदी निवड होणे हे अभिमानास्पद आहे. त्यांनी कलेल्या राजकीय व सामाजिक कार्याची ही पावती आहे. या पदाच्या माध्यमातून समाजातील गरजू व शेवटच्या घटकाचे पश्न समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करावे, अशी सूचना करून सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यावेळी महेंद गंधे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानून शतक पार केलेल्या संस्थेच्या अध्यक्षपदी काम करण्याची मिळालेल्या संधीचे सोन करून या संस्थेस अधिक उभारणी देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली देशभर काम करू असे सांगून विविध विषयांवर फडणवीसांशी चर्चा केली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रामजीनगरची नाविन्यपूर्ण व गुणवत्तापूर्ण शाळा म्हणून निवड

सोयगाव,दि.४ सप्टेंबर - जिल्हा परीषद छत्रपती संभाजीनगरने जिल्हा भरातील जिल्हा परिषद शाळां मधील १२८ शाळांची निवड नाविन्यपूर्ण व गुणवत्तापूर्ण शाळां म्हणून केलेली असून त्यामध्ये सोयगांव तालुक्यातील आठ शाळांची निवड करण्यात आलेली असून यामध्ये सोयगांव केंद्रातील उपक्रमशिल शाळा म्हणून नावारूपास आलेल्या जिल्हा परीषद प्राथमिक शाळा रामजीनगर या शाळेची निवड करण्यात आलेली आहे.रामजीनगर शाळेने शाळेची स्वत:ची जागा उपलब्ध नसतांनाही शालेय व्यवस्थापन समिती व पालकांच्या मदतीने पालकांनी दिलेल्या जागेत परसबाग फुलवून मागिल वर्षी परसबाग स्पर्धेत सोयगांव तालुक्यातून पहीला क्रमांक मिळवलेला असून याशाळेचे मुख्याध्यापक किरणकुमार पाटील व सहशिक्षक गोपाल चौधरी हे शालेय व्यवस्थापन समिती,पालक तसेच सोयगांव केंद्राचे केंद्र प्रमुख फिरोज तडवी यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी नेहमी नाविन्यपूर्ण उपक्रम शाळेत राबवत असतात.नाविन्यपूर्ण व गुणवत्तापूर्ण शाळा म्हणून निवड झाल्याबद्दल रामजीनगर शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक,शालेय व्यवस्थापन समिती यांचे सोयगांव तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी रंगनाथ अढाव ,गटसमन्वयक तथा केंद्र प्रमुख सचिन पाटील,सोयगांव केंद्रांचे केंद्र प्रमुख फिरोज तडवी,गोपाल पाटील,उमेश महालपुरे,नितीन राजपूत,मोतीराम जोहरे,रामदास फुसे यांच्यासह केंद्रातील व तालुक्यातील शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

हातगाडी चालकांना छत्री वाटप

वाळूज महानगर (प्रतिनिधी) - बजाजनगर भागातील मुख्य बाजारपेठ असलेल्या मोहोटा देवी मंदिर चौक व शहर प्रमुख सागर शिंदे यांच्या संपर्क कार्यालयात शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते हातगाडी चालक छोट्या व्यवसाय करणाऱ्यांना मोठ्या छत्र्या मोफत वाटप करण्यात आल्या. यावेळी उपतालुका प्रमुख विशाल खंडागळे , बिबन सय्यद, दत्तात्रय वरपे, नामदेव सागडे, संजय मुरादे, गणेश सूर्यवंशी, रोहित चव्हाण, सतीश हिवाळे, संतोष चंदन, त्रिम्बक जगताप, लहू खराटे, दिनेश लोंढे, मंथन दाते, विनोद सोनवणे, विजय वाडेकर, अमोल होर्शिळ, इस्माईल पठाण, शुभम जाधव, सुमेध राऊत आदींची उपस्थिती होती.

शिवसेना नेते आदित्य ठाकरेंकडे खुर्द पांगरीच्या ग्रामस्थांनी मांडली कैफियत

अतिवृष्टीग्रस्तांना दिला दिलासा; तात्काळ निवाऱ्याची व्यवस्था करण्याचा दिला शब्द

तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

शिवसेना नेते आ. आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत आणि विरोधी पक्ष-नेते अंबादास दानवे, खासदार संजय जाधव यांनी मंठा तालुक्यातील पूर परिस्थितीची पाहणी केली. तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले. अनेकांचे संसार उघड्यावर पडले. अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी बुधवार ता.४ रोजी शिवसेना नेते आ. आदित्य ठाकरे, खासदार संजय राऊत, विरोधीपक्ष नेते ना. अंबादास दानवे, खा. संजय जाधव यांनी खुर्द पांगरी येथे झालेल्या नुकसानीची पाहणी केली. तसेच ग्रामस्थांशी संवाद साधून नैसर्गिक आपत्तीमध्ये आम्ही आपल्या सोबत आहोत असा दिलासा दिला. यावेळी

त्यांच्यासोबत शिवसेना नेते लक्ष्मण वडले, जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए जे बोराडे, भास्कर आंबेकर, संजय लाखे पाटील, अनिरुद्ध खोतकर, गोपाळराव बोराडे, उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, तहसीलदार सोनाली जोंधळे यांच्यासह शेतकरी, ग्रामस्थ, महिला भगिनी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.

यावेळी ग्रामस्थांनी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती दिली. ग्रामस्थांना घरदार सोडावे लागले, लेकराबाळांना सोबत घेऊन सुरक्षित ठिकाणी जावे लागले. असे सांगताना ग्रामस्थांना अक्षरशा रडू कोसळले. शेती पिकांचे शंभर टक्के नुकसान झाले तर घरात पाणी गेल्यामुळे अन्नधान्य वाहून गेले अशी कैफियत ग्रामस्थांनी मांडली. शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी ग्रामस्थांच्या निवाऱ्याची तात्काळ व्यवस्था करणार असल्याचे सांगून गावातील पुलाचा व रस्त्याचा प्रश्नही मार्गी लावणार असल्याचे सांगितले. यावेळी शिवसेना काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, शेतकरी ग्रामस्थ व महिला भगिनी उपस्थित होत्या.

अतिवृष्टीने अगोदरच **नागरीक हतबल**

विघ्नसंतोषी लोकांचा खोडसाळपना कि मोठे षडयंत्र

पाझर तलाव फोडल्याने हिवाळ भरणातच परिसरातील विहीरी पडतील कोरड्या!

तभा वृत्तसेवा
जालना/सुरेश कवडे पाटील

परतुर तालुक्यातील रोहिणा नागापुर पुर्णवसन झालेल्या गावाच्या पाठीमागील बाजूस तसेच परतुर एम आए डिसी च्या डाव्या बाजुला तब्बल पंचविस हेक्टर क्षेत्रावर असलेले खडकी पाझर तलाव काही खोडसाळ पणाच्या कारणाने जेसिबीच्या सहाय्याने फोडण्यात आला आसल्याचे येथील गामस्थांनी दै .तरुण भारत च्या प्रतिनिधी बोलताना सांगितले कि गेल्या दोन दिवसांपासून या पाझर तलावांची तोडफोड करण्यात येत होती यात दोन जेसिबी द्वारे स्वतः परतुरचे नांमाकीत तलाठी यादव साहेब जेसिबी सोबत आसल्याच माहिती परतुर येथील इंदिरा नगर येथे असलेला जेसिबी मालक

सांगत होता की , तलाठी यादव यांच्याकडे परतुर चे उपविभागीय अधिकारी यांचे पत्र सोबत घेऊन तलाव फोडला आहे. पण संबंधीत अधिकारी सांगतात की, आम्हाला तलाव फोडल्याची माहितीच तुमच्याद्वारे मिळाली असून माझा किंवा माझ्या प्रशासनातील अधिकारी यांचा कोणताही तसा आदेश किंवा पत्र काढलेले नव्हते जो कोणी असेल त्याला शोधुन योग्य ति कारवाई करण्यात येईल .

> या जेसीबी चालकांच्या नं.७७०९१३८६१२ वर संपर्क साधला असता नईम शेख हा म्हणतो माझी जेसिबी होती आणि तुमच्या म्हणजेच एसडीएम यांचे पत्र तलाठी यादव घेऊन आले होते नंतर दोन दिवस जेसिबीने तलाव फोडला.

> संपूर्ण घटनेची सविस्तर माहिती घेतो त्यांनी माझेच नाव वापरले अशी माहिती मला अनेकांनी सांगितली संबंधितावर योग्य ती कारवाई करतो. **–पद्माकर गायकवाड, उपविभागीय अधिकारी, परतूर**

संक्षिप्त

अतिवृष्टीत पडलेली गरिबांची घरे बांधण्यासाठी सतीश घाटगे आले धावून

मोडलेले संसार उभा करण्यासाठी लावला हातभार

तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी

दि ३ सप्टेंबर जालना जिल्हाभरात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अनेक गावात घरांची पडझड झाली. कारला गावात वादळी पावासामुळे अनेक गरिब कुटुंबाची घरे कोसळ्याने त्यांचा संसार उघड्यावर आला. या कुटुंबाची घरे उभे करण्यासाठी भाजपा नेते तथा समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांनी पुढाकार घेत त्यांनी आर्थिक मदत केली आहे.

मजुरी करून पोट भरणाऱ्या आणि उरलेल्या पैशात तीन मुलांचा जबाबदारी सांभाळणाऱ्या जालना तालुक्यातील कारला येथील मीनाताई गवळी याचं घर अतिवृष्टीत उध्वस्त झाल. पतीच्या अकाली जाण्याने त्या एकट्याच मजुरी करून आपल्या तीन मुलासोबत राहतात. अतिवृष्टीत त्याचं मातीच घर कोसळल आणि त्यांचा संसार उघड्यावर आला. या संकटात त्यांच्यासोबत सतीश घाटगे खंबीरपणे उभा राहिले. त्यांचा संसार पुन्हा उभा करण्यासाठी सतीश घाटगे यांनी कारला गावात येऊन त्यांना धीर दिला. आपली बहीण मानून पडलेलं घर बांधून देण्यासाठी त्यांना आर्थिक मदत केली. तसेच याच गावातील शकुंतला दिलीप कावळे यांचे देखील घर अतिवृष्टीत पडले. त्यांनाही सतीश घाटगे यांनी घर पुन्हा उभा करण्यासाठी आर्थिक मदत केली. या मदतीबद्दल गावकऱ्यांनी व बाधित कुटुंबांनी सतीश घाटगे यांचे आभार मानले.

सिद्धार्थ महाविद्यालयांमध्ये महिलांचे आरोग्यविषयी जागरुकता कार्यशाळा संपन्न

तभा वृत्तसेवा
जाफराबाद/प्रतिनिधी

दि.०३ सप्टेंबर, २०२४ रोजी सिद्धार्थ महाविद्यालय, जाफ्राबाद येथे महिलांचे आरोग्याविषयी जागरूकता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. र.तू. देशमुख हे होते तर मार्गदर्शक म्हणून आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्टच्या जाफ्राबाद तालुका समन्वयक श्रीमती.प्रणिता जाधव ह्या उपस्थित होत्या. तसेच वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रो.डॉ.सुनील मेढे, प्रा.अनिल वैद्य यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या श्रीमती.प्रणिता जाधव ह्यांनी जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जग उद्धारी' अशा समाजातील महत्त्वपुर्ण घटक महिला सशक्त असण्यावर आपल्या मार्गदर्शनातून ओहा -पोह केला. किशोरवयीन मुलींना तसेच महिलांना आरोग्यविषयक समस्यावर प्रात्यक्षिकांद्वारे उपाययोजना सुचविल्या. या कार्यशाळेत मासिक पाळी, पीसोओडी, पीसीओएस, वंध्यत्व सारख्या तक्रारी तसेच ॲनिमिया आणि कॅल्शियमचा अभाव आणि यांचे दुष्परिणामांची सखोल माहिती दिली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.र.तू. देशमुख यांनी आपल्या प्रेरक शब्दातून अध्यक्षीय समारोपप्रसंगी आरोग्य जपण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न विद्यार्थ्यांनी कशाप्रकारे करण्यात यावे, याविषयी मार्गदर्शन केले.संपूर्ण राष्ट्रीय आरोग्याचा विचार करता महिलांचे आरोग्य या घटकाला त्यामध्ये अनन्य साधारण महत्त्व आहे. या देशातील महिलांचे आरोग्य चांगले राहिले तर त्याचा परिणाम निश्चितपणे देशाच्या सर्वांगीण विकासासाठी होऊ शकेल. आज आपल्या देशातील महिलांचे आरोग्य ही चिंतेची आणि चिंतनाची बाब बनली आहे. या महिलांचा विकास लहानपणापासूनच व्हायला हवा. तिच्या शारीरिक व मानसिक आरोग्याची जपणूक होणे आवश्यक आहे, असे मत प्राचार्य यांनी सर्वांसमोर मांडले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.सारिका जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा.सरिता मणियार यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रा.सुनंदा सोनुने, प्रा.मनिषा मोहिते, प्रा.निर्मला खांडेभराड यांनी परिश्रम घेतले.यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी- विद्यार्थिनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणीची नोंदणी तातडीने करावी -जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

महसूल व वन विभाग शासन निर्णयान्वये ई-पीक पाहणी बाबतची माहिती भ्रमणध्वनीमधील ॲपद्वारे गाव नमुना १२ मध्ये नोंदविण्यासाठी कार्यपध्दती निश्चित केली आहे. महाराष्ट्र राज्यामध्ये ई-पीक पाहणी प्रकल्प क्षेत्रीय स्तरावर महसूल व कृषी विभागाने संयुक्तरित्या राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार जिल्ह्यात ई-पीक पाहणी कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु झालेली आहे. जे शेतकरी ई-पीक पाहणी ॲप प्रणालीवर त्यांचा पीक पेरा नोंदणी करणार नाहीत त्यांना पीक कर्ज, पीक विमा, नुकसानभरपाईसह इतर शासकीय योजनाचा लाभ मिळणार नाही. तरी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी ई-पीक पाहणीची नोंदणी तातडीने करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

ई-पीक पाहणी प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या, अनुषंगाने सर्व तालुकास्तरावर प्रचार प्रसार, प्रसिध्दी करण्यात आलेली आहे. तसेच शेतकऱ्यांना मोबाईल ॲपद्वारे ई-पीक पाहणीची नोंदणी करण्यासाठी प्रशिक्षणही देण्यात आलेले आहे. जालना जिल्ह्यात दि. १ ऑगस्ट २०२४ पासून खरीप हंगाम ई-पीक पाहणीची सुरवात झाली असून चालु हंगामासाठी सुधारित मोबाईल ई- पीक पाहणी ॲप (डीसीएस) व्हर्जन ३.०.०.० गुगल प्लेस्टोअरवर उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. वर्ष २०२३ च्या खरीप हंगामातील कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्सव्यवसाय विकास विभागाच्या दि. २९ जुलै २०२४ रोजीच्या शासन निर्णयानुसार सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्थसहाय देण्यासाठी सुचित केले आहे. या शासन निर्णयात राज्यातील सन २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना ०.२ हेक्टरपेक्षा कमी

क्षेत्रासाठी सरसकट १ हजार तर ०.२ हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रती हेक्टर ५ हजार रुपये (२ हेक्टरच्या मर्यादेत) अर्थसहाय्य मंजूर करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी राज्यातील ज्या कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०२३ च्या खरीप हंगामामध्ये ई-पीक ॲप, पोर्टलव्दारे कापूस व सोयाबीन लागवडीची नोंद केली आहे असे नोंदणीकृत शेतकरीच अर्थसहाय्याकरीता पात्र राहतील. ई-पीक पाहणी ॲप प्रणालीवर नोंद असलेल्या क्षेत्रानुसार व त्याप्रमाणात परिगणना करून अर्थसहाय्य अनुज्ञेय राहील. याप्रमाणे कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी पात्रतेचे निकष ठरविण्यात आले आहेत. मोबाईल ॲप प्रणालीवर पीक पेरा नोंदणीबाबत सर्व क्षेत्रिय कार्यालयाच्या स्तरावर प्रचार, जनजागृती करण्यात आलेली आहे.

माळी महासंघाच्या मराठवाडा कार्याध्यक्षपदी माणिकराव वाघमारे

तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी

तालुक्यातील फुलवाडी येथील रहिवाशी तथा परतूर पंचायत समितीचे माजी सभापती माणिकराव वाघमारे यांची माळी महासंघाच्या मराठवाडा कार्याध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

परभणी येथे झालेल्या माळी हक्क परिषदेत माळी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अविनाश ठाकरे यांनी त्यांना मराठवाडा कार्याध्यक्ष नियुक्तीचे पत्र देत त्यांना शुभेच्छा दिल्या.यावेळी अरुण तिखे माळी महासंघ महाराष्ट्र अध्यक्ष, आसारामजी विरकर, जगन्नाथ रासवे कोषाध्यक्ष महाराष्ट्र,देवनाथ जाधव मराठवाडा विभागीय अध्यक्ष,संतोष रासवे जिल्हा अध्यक्ष जालना, परसराम गायके , विश्वनाथ थोरे ,संजय साडेगावकर, परतूर चे माजी उपविभागीय अधिकारी भाऊसाहेब जाधव आदी मान्यवरांची उपस्थिती होती.या माध्यमातून माळी समाजाचे संघटन मजबूत करून समाजाच्या समस्या सोडवण्याचा आपला प्रयत्न असेल अशी प्रतिक्रिया माणिकराव वाघमारे यांनी व्यक्त केली.

श्री अनोखा गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी अनिल गोयल, योगेश मानधना यांची फेर निवड

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

गणेशोत्सवात आपली वेगळी प्रतिमा निर्माण केलेल्या जालना शहरातील प्रतिष्ठीत, महाराष्ट्रात ख्याती प्राप्त असलेल्या श्री .अनोखा गणेश मंडळ आयोजित गणेशोत्सव -२०२४ च्या अध्यक्षपदी कालिंका स्टीलचे संचालक, उद्योजक अनिल गोयल आणि ऑल इंडिया स्टील असोसिएशनचे अध्यक्ष तथा वरद फर्टीलायझर्सचे संचालक योगेश मानधना यांची फेर निवड करण्यात आली आहे. श्री.अनोखाचे संस्थापक अध्यक्ष अजय (जगदीश) भारतिया यांच्या अध्यक्षतेखाली नूतन कार्यकारिणी निवडीसाठी बुधवारी (ता.०४) छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील मंडळाच्या कार्यालयात बैठक घेण्यात आली. मंडळाचे कार्याध्यक्ष संजय अग्रवाल (रूपम) यांच्यासह सदस्यांची यावेळी उपस्थिती होती. गणेशोत्सवात आपले वेगळेपण जपलेल्या अनोखा गणेश मंडळातर्फे गतवर्षी, १०८ किलो वजन असलेली बाप्पांची अद्भुत मूर्ती साकारली, मुर्तीस सुवर्णजडीत सुशोभित करण्यासह नयनरम्य देखावा जालनेकर भाविकांना पहावयास मिळेल, अभूतपूर्व आणि ऐतिहासिक असा गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय घेतला असून त्या अनुषंगाने बैठकीत नियोजन करण्यात आल्याचे संस्थापक अजय (जगदीश) भरतीया यांनी सांगितले. सर्वानुमते अध्यक्षपदी अनिल गोयल आणि योगेश मानधना यांची निवड करण्यात आली. मंडळाची उर्वरित कार्यकारिणी लवकरच जाहीर केली जाईल. असे मंडळाचे संस्थापक अजय (जगदीश) भारतिया कार्याध्यक्ष संजय अग्रवाल (रूपम) यांच्यासह सदस्यांनी कळविले आहे.

परतुर; अतिवृष्टीचा पहिला बळी, वाहुन गेलेल्या बाळासाहेब पडोळेचे प्रेत सापडले नदीत

तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी

दोन दिवसांपूर्वी परतूर शहर व सबंध तालुक्यांमध्ये झालेल्या भयंकर पावसाने जनजीवन विस्कळीत केले तालुक्यातील नदी नाले ओढे भरून वाहू लागले यात अनेकांच्या शेतामध्ये गुडघाभर पाणी साचलेले होते तर शेतकऱ्यांचे जनावरे यात गाई बकऱ्या कुत्रे इत्यादी प्राण्यांची ही ससे हलकट झाली येथील निम्न दुधना प्रकल्पातून धरणाचे पाणी सोडले जात असल्याचे कळताच तालुक्यातील मापेगाव येथील बाळासाहेब निवृत्ती पडवळे या गरीब शेतकऱ्याने नदीपात्रात टाकलेली पाण्याची मोटर काढण्यासाठी पात्रात उतरताच धरणातून सोडलेल्या पाण्याचा प्रवाह वाढल्याने यात तो बाहेर येऊ शकला नाही व गुदमरून मरण पावला गेल्या दोन दिवसापासून प्रशासनाच्या वतीने व गाव पातळीवर लोकांच्या वतीने त्याची शोधाशोध सुरू होते शेवटी काल त्याचे नदीपात्रात पेट सापडले या घटनेने सर्वत्र हळहळ करण्यात येत आहे या अतिवृष्टीचा हा पहिला बळी ठरला प्रचंड पावसाने यापूर्वीच काही शेतकऱ्यांच्या काही बकऱ्या मेल्याचे कळते या पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असून अनेकांच्या घरांमध्ये पाणी साचले तर अनेकांच्या घरांची पडझड झाल्याचे चित्र पाहायला मिळाले मात्र जीवित हानी झाल्याने सर्वत्र करण्यात येत आहे याबाबत प्रशासनिक पातळीवर संबंधित मयत शेतकऱ्यांच्या कुटुंबाला आर्थिक मदत करण्यात यावी अशी मागणी होत आहे

मुलींना निर्भय आणि निडर बनविणे हेच हर घर योद्धा अभियानाचे ध्येय -पोलिस अधिक्षक अजयकुमार बंसल

मुलींनी नारी शक्ती म्हणून पुढे येऊन मुँह तोड जवाब द्यावा- संगीताताई गोरंट्याल

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

अत्याचाराच्या वाढत्या घटना विचारात घेता, मुलींनी स्वसंरक्षणाची कौशल्ये आत्मसात केल्यास आत्मविश्वास वाढून वेळप्रसंगी त्या वाईट प्रसंगांना खंबीरपणे तोंड देऊ शकतील. तुमच्या संरक्षणासाठी पोलीस तर तुमच्या पाठीशी आहेच; परंतु, प्रत्येक ठिकाणी आम्ही पोहोचू शकत नाहीत. त्यामुळे रोटरी मिडटाऊन व विविध सामाजिक संस्थांच्या संस्थांच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या हर घर योद्धा या अभियानात मुलींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून स्वसंरक्षणाचे धडे घेऊन निर्भय व निडर बनावे, अशी साद पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल यांनी मुलींना घातली.

माजी नगराध्यक्ष सौ. संगीताताई गोरंट्याल यांच्या संकल्पनेतून पोलिसांच्या सहकार्याने रोटरी क्लब ऑफ जालना मिडटाऊनने रोटरी परिवार, इन्नरव्हील क्लब, लायन्स क्लब, आद्विक क्लब व विविध सामाजिक संस्थांना सोबत घेऊन आयोजित केलेल्या हर घर योद्धा या अभियानाचा शुभारंभ ३ ऑगस्ट रोजी येथील श्रीमती

दानकुवर कन्या विद्यालयात अजयकुमार बंसल यांच्या करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. संगीताताई गोरंट्याल ह्या होत्या. व्यासपीठावर श्रीमती दानकुवर कन्या विद्यालय समितीचे अध्यक्ष महेंद्र गुप्ता, सचिव मुकेश अग्रवाल, कोषाध्यक्ष संजय अग्रवाल, रोटरीचे प्रांतपाल डॉ. सुरेश साबू, सहाय्यक प्रांतपाल किशोर देशपांडे, क्लबचे अध्यक्ष सागर दक्षिणी, सहसचिव मोनाली भक्कड आदींची उपस्थिती होती.

श्री. बंसल पुढे म्हणाले की, महिला व मुलींचे संरक्षण ही पोलिसांची जबाबदारी आहे. त्यासाठी पोलीस खातेही स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देण्यासाठी पुढाकार घेते. मात्र, हेच काम सर्वांनी मिळून एकत्रितरीत्या केले तर चांगले होऊ शकते. रोटरी मिडटाऊनच्या आवाहनानुसार रोटरी परिवार व विविध सामाजिक संस्थांनी यासाठी पुढाकार घेतल्याने हर घर योद्धा या अभियानाला बळ मिळाले आहे. मुलींना निर्भय आणि निडर बनविणे, हे या अभियानाचे ध्येय असल्याचे त्यांनी सांगितले. सौ संगीताताई गोरंट्याल म्हणाल्या की, कोलकाता आणि बदलापूर येथील अत्याचाराच्या घटनेनंतर प्रत्येक मुलीला स्वसंरक्षणाचे धडे मिळाले तर अशा घटना टाळता येतील, या उद्देशाने हर घर योद्धा ही संकल्पना मनात आली. मात्र मी एकटी हे करण्यापेक्षा सर्वांनी मिळून त्यासाठी योगदान दिले तर जास्तीत जास्त शाळा महाविद्यालय आणि कोचिंग क्लासेसमध्ये राबण्याचा आपला मनोदय होता. त्यानुसार रोटरी मिडटाऊन हा क्लब विविध सामाजिक संस्थांना सोबत घेऊन आपली संकल्पना पुढे घेऊन जात असल्याबद्दल आपण आभारी आहोत.

या अभियानासाठी मार्शल आर्ट टीम उपलब्ध करून देण्यासह सर्वतोपरी सहकार्य राहील. मुलींनी नारीशक्ती म्हणून पुढे यावे आणि अप्रिय घटनांना मुँह तोड जबाब द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. प्रांतपाल डॉ. सुरेश साबू म्हणाले की, प्रत्येक मुलीने स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण घेतले तर कॅन्डलमार्च काढण्याची कधीच वेळ येणार नाही. क्लबचे अध्यक्ष सागर दक्षिणी यांनी राबविले जाणारे हे अभियान जास्तीत जास्त शाळा, महाविद्यालये, कोचिंग क्लासेस, जास्त महिला कर्मचारी असलेली कार्यालये आणि आस्थापनांपर्यंत पोहचविण्यासाठी सेवाभावी संस्थांनी आमच्या सोबत यावे. प्रकल्प प्रमुख मनाली बगडिया, पूजा बंसल, अक्षय गोरंट्याल आणि अविष राठी हे या अभियानाचे चार स्तंभ असल्याचे ते म्हणाले. अक्षय गोरंट्याल यांनी अत्याचार, छेडछाडीनंतर निषेध नोंदविण्यासाठी कॅन्डल मार्च, काळ्या पट्ट्या बांधणे ठीक आहे; पण अशा घटनाच घडू नये यासाठी आई, बहिण, वहिनी यांना आत्मनिर्भर करण्यासाठी हर घर योद्धा अभियानाला सर्वांनी साथ द्यावी, असे आवाहन केले. मनाली बगडिया म्हणाल्या की, प्रत्येक शाळा आणि महाविद्यालयात दररोज एक तास याप्रमाणे तीन दिवस हे अभियान राबविले जाणार असून, आयोजनासाठी आम्हास मुख्याध्यापक, संस्थाचालक, कोचिंग क्लासेसच्या संचालकांनी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. पहिल्याच दिवशी या अभियानात दानकुवर विद्यालयातील ३०० मुलींनी सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अविष राठी यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार पूजा बन्सल यांनी मानले.

अग्रलेख

बटेंगे तो कटेंगे!

काँग्रेसकडून होत असलेला जातीनिहाय जनगणनेचा आग्रह हा भारताच्या आणखी एका फाळणीची पार्श्वभूमी तयार करण्यासाठी केला जात आहे. काँग्रेसकडून वरकरणी आर्थिकदृष्ट्या मागास जातींना राखीव जागा देण्याचा उद्देश सांगण्यात येत असला, तरी हा तर्क लवकरच भारतातील मुस्लीम आणि ख्रिस्ती धर्मीयांना लागू केला जाईल. त्यानंतर मागास जातींच्या समुदायाप्रमाणेच मुस्लिमांना स्वतंत्र राखीव जागा देण्याची मागणी रेटली जाईल आणि त्याचे पर्यवसान भारताची पुन्हा फाळणी होण्यात होईल. त्यामुळे सर्वच धर्मांतील जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे.

काँग्रेसकडून, विशेषत: त्या पक्षाचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्याकडून देशात जातीनिहाय जनगणना करण्याचा आग्रह धरला जात आहे. जातीनिहाय जनगणेची मागणी चुकीची नसली, तरी त्यामागील काँग्रेसचा उद्देश मात्र वाटतो तितका सरळ नाही. काँग्रेसला हा मुद्दा निवडणुकीत मते मिळवून देणारा वाटतो आणि त्यांच्या नेत्यांच्या आकलनानुसार या मुद्द्यावर भाजपला बचावात्मक पवित्रा घ्यावा लागत आहे. त्यामुळे काँग्रेसकडून जातीनिहाय जनगणनेची मागणी जोरकसपणे रेटली जात आहे. राहुल गांधी यांनी तर 'भारतसुंदरी'सारख्या सौंदर्यस्पर्धांमध्येही स्पर्धकांच्या जातींचा शोध घेण्याचा प्रयत्न करून या मुद्द्यावर आपण किती टोकाला जाऊ शकतो, ते दाखवून दिले. त्यांच्या त्या वक्तव्याची खिल्ली उडविण्यात आली असली, तरी या प्रश्नावर आपली भूमिका अधिक बळकट करण्याची त्यांना संधी मिळाली, हेही तितकेच खरे.

आगामी विधानसभा निवडणुका आणि उत्तर प्रदेशातील विधानसभा पोटनिवडणुकीत हा मुद्दा कदाचित मतांचे ध्रुवीकरण करू शकतो, ही शक्यता लक्षात आल्यामुळेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने हा मुद्दा गांभीर्याने घेतला आहे. रा. स्व. संघात जात-पात मानली जात नाही. संघात जातीनुसार प्रवेश किंवा पदेही दिली जात नाहीत, हेही सर्वांना ठाऊक आहे. तरीही संघाने जातीनिहाय जनगणनेस पाठिंबा दर्शविला आहे. याचे कारण या आकडेवारीमुळे देशात प्रत्येक जातीची आर्थिक व सामाजिक स्थिती काय आहे, ते समजण्यास मोठी मदत होईल. त्याचा उपयोग सरकारला आपल्या नव्या योजना आणि आर्थिक धोरण निश्चित करण्यास होईल. तसे झाल्यास गरजू समाजापर्यंत सरकारी योजनांचे लाभ अधिक प्रकर्षाने पोहोचविता येतील, हा त्यामागील विचार. थोडक्यात, संघाला या जनगणनेचा वापर समाजातील दुर्बल घटकांच्या कल्याणासाठी होणे अपेक्षित आहे.

संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी जातीनिहाय जनगणनेचे स्वागत करताना हाच मुद्दा अधोरेखित केला. सामाजिक किंवा आर्थिकदृष्ट्या कोणत्या जाती मागास आहेत, ते स्पष्ट होण्यासाठी सरकारला आकडेवारीची गरज लागल्यास त्यासाठी जातीनिहाय जनगणना उपयुक्त ठरेल. अशा जातींपर्यंत सरकारी योजनांचे लाभ पोहोचविण्यासाठी जातीनिहाय जनगणना खूप उपयुक्त ठरू शकते, असे ते म्हणाले. मात्र, या आकडेवारीचा उपयोग राजकीय स्वार्थासाठी केला जाण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. भारतात जात हा संवेदनशील मुद्दा असून, देशाच्या एकात्मतेच्या दृष्टीने जातीजातींमधील संबंध हेही महत्त्वाची भूमिका बजावतात, असे सांगून ते म्हणाले की, ''या मुद्द्याचा संकुचित राजकीय लाभासाठी वापर होऊ नये.''

यातील विरोधाभास असा की, स्वातंत्र्यानंतर किमान ५५ वर्षे देशात काँग्रेस पक्षाची सत्ता होती. २००४ ते २०१४ या काळातही काँग्रेस सत्तेत होती. पण, आपल्या कार्यकाळात काँग्रेसने जातीनिहाय जनगणनेचा मुद्दा कधीच उपस्थित केला नाही. उलट, या पक्षाने त्यास विरोधच केला. पण, २०१९ मध्ये सलग दुसऱ्यांदा लोकसभा निवडणूक हरल्यानंतर काँग्रेसने अचानक जातीनिहाय जनगणनेचा मुद्दा उचलून धरला आणि आता त्या पक्षाने त्याला आपला प्रमुख मुद्दा बनविला आहे. यातही गंमत म्हणजे, ज्या राज्यांमध्ये काँग्रेसची सत्ता आहे, तेथील सरकारांनी जातीनिहाय जनगणना केली असली, तरी त्याची आकडेवारी जाहीर केलेली नाही. कर्नाटक राज्यात अशी जातीनिहाय जनगणना करण्यात आली असली, तरी तेथील सरकारने ती जाहीर केलेली नाही. बिहारमध्ये जेडीयू व राजद या पक्षांच्या मदतीने काँग्रेस सत्तेत असतानाही अशी जनगणना झाली होती.

जातीनिहाय जनगणना ही एरवीही जनगणनेच्या कामाचा एक भाग असतो. पण, सरकार आजवर जातीनिहाय धार्मिक लोकसंख्या जाहीर करीत नसे. लोकसंख्येत हिंदू-मुस्लीम-ख्रिस्ती वगैरे प्रमुख धर्मीयांचे प्रमाण किती, तेवढेच जाहीर केले जात असे. आता केवळ हिंदू समाजातील जातींचे प्रमाण आणि त्यांची आर्थिक स्थिती जाहीर करण्याची मागणी केली जात आहे. पण, जातीनिहाय जनगणना करायची असेल, तर सर्वच धर्मांतील जातींची जनगणना केली पाहिजे. जातीव्यवस्था फक्त हिंदू धर्मात आहे, हा आजवरचा सर्वात मोठा भ्रम असून तो राजकीय कारणास्तव हेतूतः जोपासला गेला आहे. भारतात सर्वच धर्मांच्या लोकांमध्ये काही प्रमाणात जातीव्यवस्था अस्तित्वात आहे. मुस्लीम समाजात अनेक जाती आहेत. शिवाय, शिया व सुन्नी या प्रमुख पंथांसह अहमदिया, बोहरी, आगाखानी खोजा वगैरे अनेक उपपंथही आहेत. या सर्व समाजांची आर्थिक स्थिती भिन्न आहे. ख्रिस्ती धर्मातही कॅथलिक, कॅथलिक सीरियन, मलबारी वगैरे उपपंथ आहेत. तीच स्थिती शीखांची आहे. त्यामुळे जातीनिहाय जनगणना ही सर्वधर्मीयांची झाली पाहिजे.

सध्या तरी काँग्रेस आणि तिच्या मित्रपक्षांकडून केवळ हिंदू धर्मीयांना लक्ष्य केले जात आहे. त्याचे कारण २०१९ मधील लोकसभा निवडणुकांचे निकाल. केंद्रात नरेंद्र मोदी यांचे सरकार आल्यापासून हिंदू समाज एकजूट होऊ लागला आहे. काँग्रेसच्या आजवरच्या मुस्लीम लांगूलचालनाच्या राजकारणाचे दुष्परिणाम काय आहेत, त्याची झळ हिंदू समाजाला जाणवू लागली होती. मोदींच्या नेतृत्वाखाली हिंदू समाज एकवटू लागल्याने काँग्रेसला आपला राजकीय अंत दिसू लागला होता. हिंदू मतांमध्ये फाटाफूट केल्याशिवाय आपले राजकीय अस्तित्व नष्ट होईल, हे लक्षात आल्यानेच काँग्रेसला एकाएकी जातीनिहाय जनगणनेचा साक्षात्कार झाला. हिंदूंमध्ये जातीच्या मुद्द्यावर फूट पाडणे हे अतिशय सोपे काम होते. आता मागास जातींचा आधार घेऊन त्यांना अधिक वाटा देण्याची मागणी काँग्रेसकडून केली जात आहे. त्यामागील खरा उद्देश हा निकष मुस्लीम समाजालाही लागू करणे हा आहे. मुस्लीम समाजही मागास आहे, असे भासवून त्यांना स्वतंत्र राखीव जागा देण्याची मागणी काँग्रेसकडून केली जाईल. त्याचे अंतिम पर्यवसान देशाची आणखी एकदा फाळणी करण्यात होईल, याची दाट शक्यता आहे. ही अतिशयोक्ती नाही. स्वातंत्र्यापूर्वीही याचप्रकारे देशाच्या मुस्लीमबहुल प्रांतांचे रुपांतर पाकिस्तानात करण्यात आले होते. म्हणूनच जातीनिहाय जनगणनेचा मुद्दा गांभीर्याने आणि तारतम्याने घेतला पाहिजे आणि योगी आदित्यनाथ यांचा 'बटेंगे तो कटेंगे' हा संदेश लक्षात ठेवला पाहिजे.

◆◆

पाकिस्तानसमोर नव्या बलुची बंडाचे आव्हान

मागील काही दिवसांत पाकिस्तानातील बलुच आंदोलनाने उग्र स्वरुप धारण केले असून, सैन्यावरील जीवघेणे हल्ले शरीफ सरकारच्या जिव्हारी लागले आहेत. त्यानिमित्ताने पाकिस्तानपासून कायमच स्वतंत्र होण्याची मागणी करणारा बलुचिस्तान प्रांत, त्यासाठीची बलुची आंदोलने आणि भारताची भूमिका यांचा आढावा घेणारा हा लेख...

पाकिस्तानचा सर्वात मोठा प्रांत असलेल्या बलुचिस्तानमध्ये हिंसाचाराने पुन्हा एकदा थैमान घातले आहे. 'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी'ने दि. २६ ऑगस्ट रोजी मुसाखेल, पिशिन, क्वेट्टा, सिबि, मस्तुंग, कलात, बोलान, पंजगुर, बेला, तुर्बात, संतसर आणि पासनी येथे हल्ले केले. त्यात पाकिस्तानचे १०२ सैनिक मारले गेल्याचा दावा करण्यात आला. बेला येथील हल्ल्यात एकाच ठिकाणी ४० सैनिकांना मारल्याचा दावा करण्यात आला. दि. २६ ऑगस्ट हा बलुचिस्तानचे माजी मुख्यमंत्री नवाब अकबर शाहबाझ खान बुग्ती यांचा स्मृतिदिन होता. प्रारंभीच्या काळात पाकिस्तानी सैन्य आणि सरकारसोबत जुळवून घेणाऱ्या बुग्तींनी जनरल परवेझ मुशर्रफ यांच्या काळात सशस्त्र बंड केले होते. २००६ साली याच दिवशी पाकिस्तानच्या सैन्याने केलेल्या कारवाईत त्यांची हत्या करण्यात आली होती.

विदेशनीती
अनय जोगळेकर

भारताच्या फाळणीच्या वेळेस स्वतंत्र देश होऊ इच्छिणारा बलुचिस्तान पाकिस्तानने बळजबरीने आपल्यात विलीन करुन घेतला. तेव्हापासून बलुच लोकांचा संघर्ष सुरु असला, तरी या संघर्षाचे स्वरुप आणि व्याप्ती बदलली आहे. दि. १५ ऑक्टोबर आणि दि. १६ ऑक्टोबर या कालावधीत पाकिस्तानमध्ये शांघाय सहकार्य परिषदेची बैठक आयोजित करण्यात आली असून त्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदींनाही निमंत्रित करण्यात आले आहे. पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नकवी यांनी म्हटले आहे की, ''बलुचिस्तानमधील हल्ले हा शांघाय सहकार्य परिषदेला दिलेला इशारा आहे.'' त्यांच्या विधानात तथ्य आहे. चीन शांघाय सहकार्य परिषदेच्या केंद्रस्थानी आहे. मध्य अशियातील भूतपूर्व सोव्हिएत देशांना त्यात केंद्रस्थानी ठेवले असले, तरी त्यातून चीनचा उद्देश एकीकडे अरबी समुद्र, तर दुसरीकडे युरोपशी जोडणाऱ्या मार्गिका उभारणे हा आहे. चीनचा 'बेल्ट रोड प्रकल्प' सुरु होण्याच्या पूर्वीपासूनच त्याने चीन-पाकिस्तान आर्थिक मार्गिकेत मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक केली आहे. ही मार्गिका चीनच्या पूर्व किनाऱ्याला तिबेट, सिंकियांग आणि पाकिस्तानमार्गे अरबी समुद्राशी जोडते. बलुचिस्तानमधील ग्वादर बंदर हे या मार्गिकेचे केंद्रस्थान आहे.

बलुचिस्तानचा आकार पाकिस्तानच्या ४० टक्के इतका असला, तरी बलुची लोकांची संख्या अवघी ७० लाखांच्या आसपास आहे. बलुच लोक टोळ्यांमध्ये विभागले असून त्यात बुग्ती आणि मर्री या टोळ्या सगळ्यात मोठ्या आहेत. गेल्या सात दशकांमध्ये बलुचिस्तानमध्येही छोटी, मध्यम शहरे विकसित झाली आहेत. पुढच्या पिढीतील बलुच तरुणांनी पाकिस्तान किंवा ब्रिटन आणि अमेरिकेत जाऊन शिक्षण घेतल्यामुळे त्यांच्यातून नवीन नेतृत्त्व उदयास आले आहे. त्यांना पाकिस्तानच्या सत्तेमध्ये समान वाटा हवा आहे. आपल्या प्रांतासंबंधीचे निर्णय घेण्याचे अधिकार हवे आहेत. पण, त्यांना विकास प्रक्रियेत सामील न करता पाकिस्तानने त्यांची चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानने आपल्या पंजाब आणि अन्य प्रांतांतून लोक आणून बलुचिस्तानची लोकसंख्या बदलण्याचे प्रयत्न चालवले आहेत. पंजाबमध्ये दिवसाला सुमारे १५० ते २०० भारतीय रुपये मजुरी मिळते. बलुचिस्तानमध्ये दुप्पट पैसे मिळत असल्यामुळे अनेकजण तिथे जाऊन स्थायिक व्हायला प्राधान्य देतात. त्यामुळे बलुचिस्तानमधील लोकांमध्ये प्रचंड अस्वस्थता आहे. बलुचिस्तानमध्ये मोठ्या प्रमाणावर खनिजसंपत्ती आहे. तेथील खाणींचे ठेके चिनी कंपन्यांना देण्यात आले आहेत. आपल्या संपत्तीतील अर्धा हिस्सा चीन घेतो. सुमारे ३० टक्के वाटा पाकिस्तान सरकार अन्यत्र वळवते आणि आपल्याला केवळ २० टक्के मिळतात, अशी त्यांची भावना आहे. त्यामुळे त्यातील अनेकांनी हाती शस्त्रे घेतली आहेत. अन्य समाजांत लोक जसे भरजरी वस्त्र किंवा दागिने घालून मिरवतात, तसे बलुच लोक पाकिस्तानच्या स्वातंत्र्यापूर्वीपासूनच शस्त्रास्त्रे मिरवतात.

बलुचिस्तानचा इतिहास अतिशय रंजक आहे. पाकिस्तान, अफगाणिस्तान आणि इराणमध्ये वाटला गेलेला बलुचिस्तान ओसाड आणि रुक्ष आहे. असे म्हणतात की, देवाने मातीपासून जग तयार केल्यावर उरलेली माती बलुचिस्तानमध्ये टाकली. हजारो वर्षांचा इतिहास असला, तरी तेथील लोकसंख्या छोट्या छोट्या टोळ्यांमध्ये विभागली गेली आहे. ब्रिटिशांच्या काळातही हा सगळा प्रदेश विविध खानांच्या अधिपत्याखाली होता. त्यातील 'कलात' हे सगळ्यात मोठे संस्थान होते. कलातच्या खानाने भारताच्या फाळणीनंतर कलात आणि अन्य संस्थानांसह स्वतंत्र बलुचिस्तान देश तयार व्हावा, यासाठी मोहम्मद अली जिन्हांना आपला वकील म्हणून नेमले होते. पण, स्वातंत्र्यानंतर पाकिस्तानने लष्करी बळाचा वापर करुन बलुचिस्तानवर ताबा मिळवला. तेव्हापासून विविध बलुची गट स्वातंत्र्यासाठी लढत आहेत. सुरुवातीच्या काळात पाकिस्तानने अमानुष पद्धतीने त्यांचे बंड चिरडण्याचा प्रयत्न केला. ते यशस्वी होत नाही, हे लक्षात आल्यावर प्रमुख टोळीवाल्यांना पैसा चारुन किंवा त्यांना सत्तेत वाटा देऊन त्यांच्यावर राज्य केले. पण, आता बलुच लोकांचे नेतृत्व सरदारांच्या हातून जाऊन नवीन पिढीच्या हाती आले आहे. ती सुशिक्षित आहे. लोकशाहीवर विश्वास ठेवणारी असून आपली गाऱ्हाणी मांडण्यासाठी समाज माध्यमांचा प्रभावी वापर करत आहे.

पाकिस्तानला असा संशय आहे की, भारतात अटल बिहारी वाजपेयींच्या सरकारच्या काळात पाकिस्तानबाहेर स्थायिक झालेल्या बलुच फुटीरतावाद्यांना मदत करायला सुरुवात केली. पाकिस्तानच्या काश्मीरमधील कारवायांना बलुचिस्तानमध्ये उत्तर द्यायची योजना आकारास आली. यातील एकही गोष्ट पुराव्यानिशी सिद्ध करण्यात पाकिस्तानला अपयश आले असले, तरी २००९ साली इजिप्तमधील शार्म अल शेख येथे पार पडलेल्या अलिप्ततावादी चळवळीच्या बैठकीत भारत आणि पाकिस्तानकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या संयुक्त वक्तव्यात बलुचिस्तानचा संदर्भ जोडण्यात पाकिस्तानला यश आले. भारताने हे नाकारले असले, तरी या घटनेमुळे डॉ. मनमोहन सिंग यांची प्रचंड नाचक्की झाली. २०१४ साली नरेंद्र मोदी पंतप्रधान आणि अजित डोवल राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार झाल्यानंतर भारताने उघडपणे बलुच लोकांच्या आकांक्षांना साद घालायला सुरुवात केली.

सुरुवातीला या संघर्षाची व्याप्ती पाकिस्तानपुरती मर्यादित होती. पण, आज त्यात चीन आणि अमेरिकेचा समावेश झाला आहे. चीनने 'बेल्ट रोड प्रकल्पा'अंतर्गत पाकिस्तानमध्ये ६५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला असून, त्यातील अनेक प्रकल्प बलुचिस्तानमध्ये आहेत. ग्वादर बंदरामुळे आसपासच्या लोकांना समुद्रात मासेमारी करता येत नसल्यामुळे त्यांच्यात नाराजी आहे. तेथे सापडलेल्या नैसर्गिक वायूच्या विक्रीतून मिळणाऱ्या महसुलाच्या अवघा १२.५ टक्के वाटा बलुचिस्तानला मिळत असल्यामुळे आपल्याला लुबाडले जात असल्याची भावना निर्माण झाली आहे. चीनने मोठ्या संख्येने कामगार आणि तंत्रज्ञ आणले असून पाकिस्तानच्या अन्य भागांतूनही मोठ्या संख्येने कामगार आणण्यात आले आहे. त्यामुळे गेल्या काही वर्षांमध्ये पाकिस्तानी सैन्यासोबतच चिनी प्रकल्पांनाही लक्ष्य करण्यात आले आहे. आजवर पाकिस्तान अमेरिकेकडे भारताविरोधात तक्रार करत असे. पण, आता चीनला शह देण्यासाठी अमेरिकाही बलुच लोकांना मदत करत असल्याची भीती पाकिस्तानला आहे. पाकिस्तानच्या डोक्यावर चीनचे प्रचंड कर्ज असून 'बेल्ट रोड प्रकल्पा'च्या यशातच ते कर्ज फेडले जाण्याची शक्यता होती. आज बलुचिस्तानमधील बंडामुळे पाकिस्तानचे आर्थिक भवितव्य आणखी धूसर होत आहे.

◆◆

हे तर बाबूंचे राज्य...

वेध
विजय कुलकर्णी

राज्य कोणतेही असो, सत्ताधारी राजकीय नेतेमंडळींना राज्यशकट हाकण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांचे सहकार्य हे अपेक्षित असते आणि तसे ते मिळतेही. पण, अनेकदा नेतेमंडळींनी, मंत्रिमहोदयांनी अधिकाऱ्यांवर टाकलेल्या या विश्वासाचा गैरफायदाही घेतला जातो. 'अपुनीच भगवान हैं' असे म्हणत हे प्रशासकीय बाबू स्वतःलाच सत्ताधारी समजू लागतात. इतके की, हे सरकारही आपले काही वाकडे करु शकत नाही, या आविर्भावातच ते प्रशासकीय यंत्रणेत मिरवताना दिसतात. असाच काहीसा प्रकार केरळमध्ये सत्ताधारी समर्थक आमदारानेच उघडकीस आणल्याने, पिनराई विजयन यांच्या सरकारच्या अडचणीत भर पडली आहे. केरळचे एलडीएफ समर्थक आमदार पी. व्ही. अन्वर यांनी थेट मुख्यमंत्र्यांचे राजकीय सचिव आणि राज्याचे अतिरिक्त पोलीस महासंचालक (कायदा-सुव्यवस्था) या दोघांवर गंभीर आरोप केले आहेत. अन्वर यांनी पत्रकार परिषद घेऊन विजयन सरकारचे अक्षरशः धिंडवडे काढले. मुख्यमंत्र्यांचे राजकीय सचिव शशी आणि अतिरिक्त पोलीस महासंचालक अजिथ कुमार हे तस्करी, भ्रष्टाचार यांसारख्या असामाजिक आणि राष्ट्रविघातक कृत्यांमध्ये गुंतल्याचा आरोप त्यांच्यावर अन्वर यांनी केला. एवढेच नाही, तर मुख्यमंत्र्यांना अंधारात ठेवून हे दोन्ही अधिकारी परस्पर निर्णय घेत असल्याचादेखील अन्वर यांनी केलेला दावा तितकाच धक्कादायक. त्याचबरोबर राज्यातील राजकीय नेते, मंत्री आणि पत्रकारांचेही फोन टॅप केले जात असल्याचा खळबळजनक दावा अन्वर यांनी केल्याने, राज्याची यंत्रणाच हादरुन गेली आहे. मुख्यमंत्री विजयन यांच्याकडे तब्बल २० पेक्षा अधिक खात्यांचा कारभार आहे. त्यामुळे साहजिकच काही खात्यांची जबाबदारी ही मुख्यमंत्र्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांकडे सुपुर्द करणे हे स्वाभाविक. पण, या अधिकाऱ्यांनी मुख्यमंत्र्यांना डावलून परस्पर कारभार रेटून नेल्याचा, निर्णय घेतल्याचा आरोप अन्वर यांनी केला आहे. एकूणच काय, तर केरळमधील प्रशासकीय अनागोंदी आणि अराजकता यानिमित्ताने चव्हाट्यावर आली आहे. २०२० सालीही केरळमधील सोने तस्करी प्रकरण गाजले होते आणि त्यानंतर केरळचे मुख्य सचिव एम. शिवशंकर यांचीही हकालपट्टी करण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा या नवीन आरोपांनी केरळ हादरले आहे. आता या आरोपांचे राजकारणात काय पडसाद उमटतात, ते बघणे महत्त्वाचे!

◆◆

आरोपींचा पुरोगाम्यांना पुळका

कोलकाता आणि बदलापूरच्या महिला अत्याचारविरोधी घटनांवरुन देशभरात प्रक्षुब्ध वातावरण आहे. अशातच केरळच्या मल्याळी चित्रपटसृष्टीतील महिला लैंगिक शोषणाच्या घटनांना वाचा फोडणारा हेमा समितीचा अहवालही समोर आला. त्यानंतर मल्याळी चित्रपटसृष्टीतील कित्येक महिलांनी आपणहून पुढे येऊन माध्यमांमध्ये आपबिती कथन केली. तसेच दोषींवर कडक कारवाईचीही मागणी या पीडित महिलांनी केली. खरं तर यानंतर तेथील चित्रपटसृष्टीने एकजुटीने अशा आरोपींवर कडक कारवाईसाठी केरळ सरकारवर दबाव निर्माण करणे अपेक्षित होते. पण, दबाव सोडा, उलट ७० हून अधिक सिनेसृष्टीतील कलाकार, लेखक, वकील, पत्रकार आणि कार्यकर्त्यांनी केरळचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांना पत्र लिहिले. पत्र दोषींवर कारवाई करा म्हणून नव्हे, तर चक्क या पीडितांवर पोलिसांनी खटला दाखल करण्याचा दबाव आणू नये म्हणून! म्हणजेच एकप्रकारे दोषींवर कारवाई करु नका आणि त्यासाठी महिलांना तक्रार करायला सांगू नका, असाच या पत्राचा अप्रत्यक्ष सूर. या पत्रावर एकूण ७२ जणांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. यांमध्ये अभिनेता प्रकाश राज, स्वरा भास्कर, लेखिका-कार्यकर्त्या अरुंधती रॉय, मल्याळी लेखिका सारा जोसेफ, अपर्णा सेन, गायिका चिन्मयी श्रीपाद, ज्येष्ठ वकील वृंदा ग्रोव्हर आणि इंदिरा जयसिंग, केआर मीरा, एनएस माधवन यांच्या नावांचा समावेश आहे. आता या नावांवर नजर टाकली, तरी त्यांची विचारसरणी उघडच. पण, यानिमित्ताने या पुरोगामी मंडळींचा दुटप्पीपणाच चव्हाट्यावर आला. एकीकडे महिला अत्याचाराच्या घटनांवरुन मोदी सरकारविरोधात वातावरणनिर्मिती करायची आणि दुसरीकडे केरळमधील पीडित महिलांना पोलिसांकडे खटला दाखल करण्यासाठी दबाव आणू नका, अशी सरकारला विनंती करणारे पत्र लिहायचे. त्यामुळे ही मंडळी नेमके कुणाला पाठीशी घालण्याचा प्रयत्न करीत आहेत, हाच खरा प्रश्न. हे म्हणजे आरोपींसाठी सरकारदरबारी लॉबिंग करण्याचाच एक अनाठायी प्रयत्न म्हणावा लागेल. त्यामुळे हेमा कमिटीचा अहवाल जाहीर करुन, महिला अत्याचाराबाबत आपले सरकार किती सजग वगैरे आहे, असे ढोल बडवणारे विजयन सरकार त्या पीडितांना न्याय देणार की, या पुरोगामी टोळीच्या दबावाला बळी पडणार, हे पाहावे लागेल.

◆◆

ब्राझीलची 'एक्स'वर फुली

जगाच्या पाठीवर
ओंकार मुळ्ये

आजच्या काळात मानवी जीवनात समाजमाध्यमांनी एक विलक्षण पगडा निर्माण केला आहे. मुक्तपणे आपले विचार मांडण्याचे हक्काचे व्यासपीठ म्हणजे ही समाजमाध्यमे. पण, काही समाजमाध्यमे अभिव्यक्ति स्वातंत्र्याच्या नावाखाली समाजविघातक मजकुरालाही समर्थन देताना दिसतात. असेच काहीसे घडले पूर्वाश्रमीचे ट्विटर अर्थात आताच्या 'एक्स'च्या बाबतीत. 'एक्स'चे सर्वेसर्वा एलॉन मस्क यांनी केलेल्या आरोपानंतर ब्राझीलच्या सर्वोच्च न्यायालयाने 'एक्स'वर देशभरात बंदी लादली. सर्वोच्च न्यायालयाचे न्या. अलेक्झांड्रे डी मोरेस यांनी गेल्या आठवड्यात ती बंदी लादली. ब्राझीलच्या सर्वोच्च न्यायालयाने आज ती एकमताने कायम ठेवली आहे. ब्राझीलमध्ये कायदेशीर प्रतिनिधी नियुक्त करण्यासाठी न्यायालयाने दिलेली अंतिम मुदत 'एक्स'ने चुकवल्यानंतर ही बंदी लागू करण्यात आली.

न्या. अलेक्झांड्रे डी मोरेस, न्या. क्रिस्टियानो झानिन, न्या. फ्लॅव्हियो डिनो, न्या. कार्मेन लुसिया, न्या. लुईझ फक्स या पाच न्यायमूर्तींच्या खंडपीठाने सोमवारी या बंदीचे पुनरावलोकन करून पुष्टी केली. देशात कार्यरत कंपन्यांनी स्थानिक कायद्यांचे पालन केले पाहिजे आणि न्यायालयाच्या निर्णयांचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यास कायद्याचे राज्य कमी होते, असे त्यावेळी सदर न्यायमूर्तींकडून सांगण्यात आले. एलॉन मस्कच्या 'एक्स' प्लॅटफॉर्मवर ब्राझीलमध्ये बंदी घातल्यामुळे आता ब्राझिलियन लोक 'एक्स'वर प्रवेश करू शकणार नाहीत. त्यांनी यासाठी 'वीपीएन' वापरल्यास त्यांना मोठ्या दंडाला सामोरे जावे लागू शकते. या बंदीनंतर एलॉन मस्क यांनी या प्रकरणाबाबत अनेक पोस्ट्स केल्या आणि ब्राझीलच्या सर्वोच्च न्यायालयाचे न्या. अलेक्झांडर डी मोरेस यांनाही लक्ष्य केले.

वास्तविक एलॉन मस्क यांनी 'एक्स'वर एका पोस्टमधून मोरेस यांच्यावर गंभीर आरोप करत गेल्या अध्यक्षीय निवडणुकीवरही प्रश्न उपस्थित केले होते. त्यात ते असे म्हणाले, ''मला खेद वाटतो की, अनेक माजी 'ट्विटर' कर्मचाऱ्यांनी त्यांना अध्यक्षपदाच्या निवडणुकीत मदत केली.'' 'ट्विटर'च्या माजी कर्मचाऱ्यांनी त्यांना मदत केल्याचा पुरावा कोणाकडे असेल, तर आपल्या पोस्टला उत्तर देण्याचे आवाहन त्यांनी लोकांना केले होते. या सविस्तर प्रकरणाची गंभीर दखल घेत न्यायमूर्तींनी एलॉन मस्कच्या कंपनीला २४ तासांच्या आत कायदेशीर अधिकारी नियुक्त करण्याची मुदत दिली होती. परंतु, त्यावर काही उत्तर आले नाही. यानंतर, ब्राझीलच्या सर्वोच्च फेडरल कोर्टाने 'एक्स'वर संपूर्ण देशात बंदी घालण्याचा आदेश जारी केला आणि १८ दशलक्ष रियाल दंडही ठोठावला. इतकेच नाही, तर 'वीपीएन'चा वापर करत जी व्यक्ती किंवा कंपनी या सोशल नेटवर्कवर प्रवेश करण्याचा प्रयत्न करेल, त्यांना ५० हजार रियाल (सुमारे सात लाख रुपये) पर्यंत दंड होऊ शकतो, असेही त्यांनी सांगितले.

प्रारंभीच्या काळात समाजमाध्यमांतून अचूक माहिती आणि विनासायास संवाद साधल्यामुळे भ्रष्टाचार, धर्मांधता आणि खोटेपणाची हकालपट्टी करणे शक्य होते. त्यामुळेच त्यातून अधिक जागरूक राजकारणाचे आश्वासन मिळेल, असे वाटू लागले होते. गेल्यावर्षी अमेरिकन निवडणुकीपूर्वी तब्बल १४ कोटी, ६० लाख लोकांनी रशियाने पेरलेली चुकीची माहिती वाचल्याचे खुद्द फेसबुकने सांगितले होते. त्यासोबतच 'युट्यूब'नेही मान्य केले की, याच काळात रशियाशी संबंधित १ हजार, १०८ व्हिडिओ अपलोड झाले. म्हणजेच समाजमाध्यमे लोकांना जागृत करण्याऐवजी विष पेरण्याचे काम करत आहेत, असे दिसते. समाजमाध्यमांच्या वापरामुळे केवळ दरीच निर्माण होत नाही, तर ती निर्माण झालेली दरी रुंदावतेसुद्धा. अशा माध्यमांमुळे सुज्ञता आणि सत्य यांना महत्त्व मिळाले, तर ती खूपच चांगली गोष्ट ठरली असती. समाजमाध्यमांचा गैरवापर होत आहे. परंतु, इच्छाशक्ती असेल तर समाज त्यांना वेसण घालू शकतो आणि समाजजागृतीचे पूर्वी पाहिलेल्या स्वप्नांचे पुनरुज्जीवन करू शकतो.

एलॉन मस्क कायम आपल्या 'एक्स' प्लॅटफॉर्मवरून चालू घडामोडींवर भूमिका मांडत असतात. मात्र, पुराव्याविना एखाद्यावर व्यक्तीशः आरोप करणे हेही तितकेच चुकीचे आहे. त्यामुळे बंदीनंतर आता एलॉन मस्क यांची भूमिका पुढे काय असेल? ते यातून धडा घेणार का? बंदी उठेल की कायम राहील? हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

◆◆

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

नागरिकांनी सण उत्सव शांततेत साजरे करावेत- गावडे

परभणी ,/प्रतिनिधी: यावर्षी जिल्ह्यात गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद हे सण मोठ्या उत्साहात साजरा होणार असल्याने जिल्हा प्रशासनाची जबाबदारी वाढली आहे. तरी जिल्हावासीयांनी दरवर्षीप्रमाणे यावर्षीही दोन्ही सण शांततेत व उत्साहात साजरा करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांनी केले आहे.

दोन्ही सणानिमित्त जिल्ह्यातील कायदा सुव्यवस्था अबाधित राहावी याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित शांतता समितीच्या बैठकीत श्री. गावडे बोलत होते. यावेळी पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी, मनपा आयुक्त धैर्यशील जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी जीवराज डापकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी जनार्धन विधाते यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी गावडे म्हणाले की, येणाऱ्या काळातील गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद हे सण शांततेत आणि उत्साहात साजरे करावेत. तसेच त्यांनी मनपा आयुक्तांना शहरातील रस्त्यांची प्रत्याक्ष पाहणी करुन मनपाला रस्त्यांची व पथदिव्यांची दुरुस्ती करण्याच्या आणि महावितरणला मिरवणूक मार्गातील डि.पी.ची पाहणी करुन उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच समाज माध्यमांवर कोणाची ही भावना दुखविणा-या संदेशाची देवाण-घेवाण करु नये. दरवर्षी प्रमाणे यावर्षी ही सर्व नागरिकांनी उत्साहात सण साजरा करावा, असे आवाहन त्यांनी केले आहे. यावर्षी गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद हे सण साजरे करताना नागरिकांनी उत्साहाच्या भरात कुठल्याही प्रकारची जातीय व धार्मिक तेढ निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांनी केले. तसेच उत्सवाच्या कालावधीत डिजे किंवा इतर संगीताने ध्वनी प्रदूषण होणार नाही याची काळजी घ्यावी. गणेश मंडळांनी आपल्या मंडळात कुठलेही गैरकृत्या होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच मंडळातील गणेश भक्तांनी देखील अतिउत्साहात आपल्या हातून गैरकृत्या होणार नाही याची काळजी घ्यावी. जिल्ह्यात कोणत्याही ठिकाणी गैरकृत्या किंवा घटना घडल्यास त्याची माहिती तात्काळ पोलीसांना द्यावी. अवैध दारू विक्रेत्यांवर पोलीसांमार्फत कारवाई करण्यात येत आहे. यावर्षीचे गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद हे सण शांततेत व उत्साहात साजरे व्हावेत यासाठी पोलीस, महसूल आणि नगर प्रशासन नागरिकांच्या सेवेसाठी तयार आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून सण साजरा करण्याच्या सूचना त्यांनी केल्या. दरवर्षी प्रमाणे यावर्षीही गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद हे सण साजरा करण्याकरीता मनपा प्रशासन सज्ज झाले आहे. शहरातील रस्त्यांची व पथदिव्यांची दुरुस्ती करण्यात येत असल्याची माहिती मनपा आयुक्त धैर्यशील जाधव यांनी दिली. यावेळी बैठकीत शांतता समितीचे सदस्य, गणेश मंडळाचे पदाधिकारी, धर्मगुरुंनी देखील आपल्या सूचना प्रशासनासमोर मांडल्या. बैठकीस विविध विभागाचे विभाग प्रमुख, गणेश मंडळाचे पदाधिकारी, धर्मगुरू यांची उपस्थिती होती.

अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे अनुदान वाटप करा- राष्ट्रवादी पक्षाची मागणी

मानवत / प्रतिनिधी- तालुक्यात मागील तीन दिवसा पासून पावसाची संतधार सुरू आहे शेतामध्ये पाणी साचल्यामुळे कापुस, सोयाबीन, उडीद, हळद, केळी व इतर पिकं धोक्यात आली आहेत. तसेच नदी सह लहान मोटे ओडे- नाले तुडुंब भरून वाहल्यामूळे तालूक्यातील बळीराजाचे आतोनात अर्थीक फार मोठे नुकसान झाले असुन तालुक्यातील टाकळी नि, रामपुरी वु, वझुर, सावळी, राम टाकळी अशा गावांमध्ये पाणी शिरल्यामूळे अनेक शेतक-यांची घरे कोगळली व तसेच जायकवाडीच्या पाण्याचा विसर्ग सुरू झालेला असुन गोदाकाटव्या व दुधना काटच्या गावांमध्ये घरांचे व शेतीचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. तसेच तालुक्यातील पाचही मंडळ मानवत २५६.०० , केकरजवळा - २०७.०० , कोल्हा -१७६.५० , ताडबोरगाव -१५४.७५ , रामपुरी बु -२०३.७५ , या मंडळामध्ये अतीवृष्टी झाल्यामुळे गावातील घरांच शेतीतील नुकसान पृस्त पिकांचे वाधीत झालेल्या पशु धनाचे तात्त्काळ पंचनामे करून तालुक्यातील शेतक-यांना आर्थिक मदत करावी अशी मागणी राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने जिल्हाउपाध्यक्ष माणिकराव काळे , जिल्हाउपाध्यक्ष ॲड लूकमान बागवान तालूकाध्यक्ष संतोषराव लाडाणे , विशाल यादव, वैजनाथ महिपाल, प्रसाद यादव, गोविंद घांडगे, भगवान काळे, बळीराम शिंदे , बाबासाहेब काळे, यांनी पक्षाच्या प्रसिध्दी पत्राकाद्वारे मानवत तहसिलचे तहसिलदार यांच्याकडे केली आहे.

संक्षिप्त वृत्त...

ज्येष्ठ पत्रकार नारायणराव पाटील यांच्या सत्काराचे आयोजन

सेलू,/प्रतिनिधी: येथील अधिस्वीकृतीधारक तथा जेष्ठ पत्राकार नारायणराव पाटील यांच्या पासष्टी व सौ नलिनी नारायणराव पाटील यांच्या एकसष्टी सोहळ्यानिमित्त दि ०५ सप्टेंबर गुरुवारी येथील साई नाट्य मंदिरात सायं.५ वा भव्य नागरी सत्काराचे आयोजन नागरी सत्कार समितीच्या वतीने करण्यात आले आहे. गेल्या ३० वर्षांपेक्षा आधील काळ नारायणराव पाटील हे पत्राकार म्हणून कार्यरत आहेत.त्यांच्या प्रदीर्घ कारकिर्दीचा सन्मान म्हणून या नागरी सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.या कार्यक्रमासाठी प्रसिद्ध अभिनेते,जेष्ठ नाटककार,चित्रपट दिग्दर्शक तथा संगीतकार पुरुषोत्तम बेर्डे मुंबई हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार मेघना बोर्डीकर,तर स्वागताध्यक्षपदी माजी आ.हरिभाऊ लहाने हे उपस्थित राहणार आहेत.विशेष उपस्थिती म्हणून साईबाबा बँकेचे अध्यक्ष हेमंतराव आडळकर,माजी नगराध्यक्ष विनोद बोराडे,माजी सभापती अशोक काकडे,स्व.नागाबाई साडेगावकर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय साडेगावकर हे उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमास सर्व सेलूकरांनी उपस्थित राहण्याचे आवाहन नागरी सत्कार समितीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ शरद कुलकर्णी ,सर्व सदस्य व पाटील परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

जिंतूर शिवसेना शहरप्रमुखपदी पांडूरंग मुसळे यांची निवड

जिंतूर,/प्रतिनिधी : तालुक्यातील मालेगाव येथील शिवसैनिक पांडुरंग गंगाधर मुसळे यांची वंदनीय हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व शिवसेना मुख्य नेते माननीय मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या आदेशावरून शिवसेना पक्षाच्या जिंतूर शिवसेना शहर पदी नियुक्ती करण्यात येत आहे बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार मी तळागाळातील शिवसैनिकापर्यंत नेणार व मी शहरात शिवसेनेची प्रत्येक वाडीत शाखा स्थापन करणार तसेच एकनाथराव शिंदे यांच्या लाडकी बहीण या योजनेची तळागाळातील महिला पर्यंत योजना नेणार या निवडीचे श्रेय देताना शिवसेनेचे जेवढे नेते माननीय आमदार जयप्रकाश मुंदडा माननीय भास्करराव लंगोटे जिल्हाप्रमुख व्यंकटराव शिंदे तसेच शिवसेना तालुकाप्रमुख सुनीलराव आदी मान्यवर उपस्थित होते त्यांचे स्वागत सर्व स्तरावरून होत आहे.

ज्ञानेश्वर विद्यालयात खो-खो संघाने १७ वर्षे वयोगटात मिळविले घवघवीत यश

जिंतूर,/प्रतिनिधी : तालुकास्तरीय खो-खो स्पर्धेत ज्ञानेश्वर विद्यालय जिंतूर चा मुलांचा खो-खो चा संघ परभणी जिल्ह्यात जिंतूर तालुक्याचे नेतृत्व करणार ज्ञानेश्वर विद्यालयाच्या खो-खो च्या संघाने सेमी फायनल मध्ये जवाहर विद्यालय जिंतूर खो-खो संघाला हरवून फायनल मध्ये सहभाग नोंदवला तसेच फायनल मध्ये न्यू ईरा इंग्लिश स्कूल जिंतूर खो-खो च्या संघाला हरवून जिंतूर तालुक्यात खो खो खेळामध्ये प्रथम येण्याचा बहुमान पटकावला व परभणी मध्ये जिंतूर तालुक्याचे नेतृत्व संघ करणार करिता ज्ञानेश्वर जिंतूर विद्यालयातील खो-खो संघातील सर्व खेळाडूचे युवक विकास शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आदरणीय प्राध्यापक श्री भाई ज्ञानोबाजी मुंढे साहेब यांच्याकडून तसेच संस्थेचे सचिव श्री जी डी मुंढे व सहसचिव ॲड श्री कार्तीक जी मुंढे यांच्या वतीने विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य श्रीमान शिवाजी वाघ उपस्थित होते.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/
९४ २३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

अतिवृष्टीत झालेल्या नुकसानीचे पंचनामे करा- भाजपाची निवेदनाव्दारे मागणी

सेलू/ प्रतिनिधी- तालूक्यात रविवार १ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमूळे नूकसान झाल्याने नूकसानीचे तात्काळ महसुल विभागाने पंचनामे करण्याची मागणी मंगळवार ३ रोजी भाजपाच्यावतिने निवेदनाद्वारे तहसीलदार यांच्याकडे करण्यात आली आहे. मागील दोन दिवसापासून तालुक्यामध्ये होत असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे तसेच ग्रामीण भागासह ,शहरात घरांची पडझड झाली. पशुधन आणि शेतकी अवजारांचे ही नुकसान मोठ्या प्रमाणावर झाले आहे या सर्व बाबींचा विचार करून सरसकट पंचनामे करण्यात यावेत. शेतातील पशुधन गाई, वासरे,बैल,शेळ्या व मेंढ्या पुरात वाहून मृत्युमुखी पडल्या यामुळे शेतक-याचे मोठे आर्थीक नुकसान झाले आहे. ग्रामीण भागातील गावांमध्ये व शहरामध्ये घरात पाणी घुसल्यामुळे घरांची पडझड झाली आहे. तसेच नदी नाल्याकाठच्या शेतजमिनी पूर्णपणे खरडून गेल्या आहेत आहेत.तरी महसुल विभागाच्यावतिने तात्काळ नुकसानीचे पंचनामे करण्यात यावेत असे निवेदनात नमुद करण्यात आले आहे. यासाठी भाजपा तालुकाध्यक्ष दत्ता कदम,शहराध्यक्ष अशोक अंभोरे,रवि डासाळकर , अर्जुन बोरूळ ,शिवाहरी शेवाळे,कपिल फुलारी , भास्कर पडघन,अशोक शेलवाडीकर, सोळंके,अशोक ताटे, अजय डासाळकर, महेश टाके,प्रकाश गजमल,विकास ताठे, प्रकाश ताठे,संजय गटकळ, केदारेश्वर मोगल ,संदीप घुगे,रामजी डख , सुंदर गाडेकर,गोविंद शर्मा,अमोल भोसले आदींनी पूढाकार घेतला.

तुफान पाऊस, परभणी जिल्ह्यामध्ये अतिवृष्टी जिंतूर तालुक्याला पावसाने झोडपले शेतकरी झाला हवालदिल

अतिवृष्टीचे तात्काळ पंचनामे करा

जिंतूर,/प्रतिनिधी- अवकाळी पाऊस तसेच ढगफुटी जण्य अतिवृष्टी होवून तालुक्यातील शेतकऱ्यांची हाताशी असलेली खरीप पिके वाहून गेली तसेच जनावरे कोंबड्या शेळी मेंढी बैल गाय पक्षी मृत झाले आहे वाहून गेले आहेत असे बरेच नुकसान झाले आहे त्या अनुषंगाने नुकसान भरपाई म्हणुन एकरी ५०००० रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात तुरित वर्ग करावी ही शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटा च्या जिल्हा संघटिका सुरेखा शेवाळे टाले यांची प्रशासनास मागणी करण्यात आली आहे.

३१ ऑगस्ट २०२४ च्या मध्यरात्रीपासून ढगफुटी होवून पावसाने थांबण्याचे नाव घेतले नाही त्याचा परिणाम म्हणून या अवकाळी पाऊस आल्याने, शेतकऱ्याने घेतलेले खरीप पिके ही वाहून जाण्याच्या मार्गावर होती परंतु घेतलेले सर्व खरीप पिकांचे नुकसान एक तारखेला आलेल्या पावसाने सर्व पिके वाहून गेली आहेत सगळीकडे पाणीच पाणी अशी तालुक्याची अवस्था आहे यामध्ये चारठाणा, देवगाव फाटा, पिंपळगाव, अकोली, जांब, येलदरी धमधम, इटोली, गडदगव्हाण, भोगाव, आडगाव, वस्सा, दुधगाव, आसेगाव बोरी, डीग्रस, पांगरी, चांदज, कावी, मानकेश्वर, राव्हा, रेपा, पाचेगाव, पुंगळा, पांगरी, माथला, येसेगाव, रामेश्वर, अंबरवाडी तालुक्यातील अशा असंख्य गावांचा समावेश आहे. तो आपण शोधून तालुक्याचा ग्रामीण भाग पूर्णपणे पाण्याखाली असून ही शेतकऱ्याच्या पिकासाठी गंभीर बाब ठरली आहे प्रशासनाने याकडे काळजीपूर्वक लक्ष देणे गरजेचे आहे अशा पावसाच्या अवकाळी येण्याचा कुठलाही अनुमान शेतकऱ्याला नसतो याचा परिणाम म्हणून पिकवलेले मशागत केलेले सर्व शेत पिके जसं की, सोयाबीन, कापूस, हळद, तुर, मूग, हरभरा अशा सर्व खरीप पिकांचे नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. प्रशासनाने, सरकारने शेतकऱ्यांच्या या नुकसान भरपाई साठी ताबडतोब तालुक्यामध्ये पंचनामे करून, संबंधित पिकाचे पंचनामे करून एकरी ५० हजार रुपये प्रमाणे शेतकऱ्याला खात्यामध्ये मदत म्हणून वर्ग करावे. हाताशी आलेला शेतमाल हातातून जाताना शेतकरी राजाला परवडणारा नाही त्या कारणाने प्रशासनाने तुरित याची दखल घेऊन संबंधित पिकाचा पंचनामा करून माझ्या जिंतूर तालुक्यातील शेतकरी राजाला मदत देण्याचे आव्हान मी करीत आहे मी पाहिलेली ही शेतकऱ्याची परिस्थिती फार भयानक असून याकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. माननीय तहसीलदार साहेब, जिल्हाधिकारी तसेच मुख्यमंत्र्यांपर्यंत शेतकरी राजाचा हा झालेला पिकाचा आढावा आपण पोहोचवावा व एकरी ५० हजार प्रमाणे तुरित रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये वर्ग करावे. तात्काळ शेतकऱ्यांना मदत करावी असे निवेदन सुरेखा शेवाळे टाले यांनी तहसीलदार साहेब कृत क्षीरसागर मॅडम यांना देण्यात आले.

जिंतूर- जिंतूर तालुक्यात बंजारा समाजाच्यावतीने तिज हा सण श्रावण महिन्यातच साजरा केला. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना जिंतूरच्या आ.मेघना साकोरे दिसत आहेत.

३० सप्टेंबरला खासदारांची बैठक

परभणी / प्रतिनिधी- दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागांतर्गत सर्व खासदारांची ३० सप्टेंबर रोजी रेल्वे प्रश्नावर बैठक होणार आहे. तब्बल तीन वर्षानंतर दक्षिण मध्य रेल्वेने नांदेड विभागातील विविध रेल्वे प्रश्नांवर ही बैठक आयोजित केली आहे. त्यामुळे या बैठकीस महत्व प्राप्त होत आहे.

दरम्यान, या बैठकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार श्रीमती फौजिया खान यांनी मंगळवारी (दि.०३) मराठवाडा रेल्वे प्रवाशी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांबरोबर हितगुज केले व त्यांच्याद्वारे रेल्वे विषयक प्रश्न जाणून घेतले. यात नांदेड-पुणे या मार्गावर दिवसा एक्सप्रेस सुरु करावी, नांदेड-वास्को(गोवा) नवीन गाडी सुरु करावी, कोविडपूर्व नांदेड-औरंगाबाद एन्टरसिटी गाडी पुन्हा सुरु करावी, पुणे तसेच पनवेल एक्सप्रेसला कायमस्वरुपी तीन कोचेस जोडावेत, औरंगाबाद-अकोला, पंढरपूर-शेगांव नवीन गाड्या सुरु कराव्यात, रायचूर-परभणी, पटना-पूर्णा रेल्वेचा विस्तार जालना पर्यंत करावा, परभणी रेल्वे स्थानकावर अमृत भारत योजनेंतर्गत कामे करण्यात येणार आहेत.

जिंतूरमध्ये बंजारा तिज महोत्सव मोठया उत्साहात साजरा

जिंतूर ,/प्रतिनिधी: बंजारा समाजाचा तिज हा सण श्रावण महिन्यातच साजरा केला जातो. तिज सणाला समाजामध्ये अनन्यसाधारण असे महत्तुत्व आहे. आ. मेघनादीदी साकोरे-बोर्डीकर यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केलेले होते. तालुक्यामध्ये सलग दोन दिवसापासून पाऊस चालू असताना भर पावसामध्ये महिलांची तसेच बंजारा बांधवांची संख्या खूप अधिक होती.

अँड.विनोद राठोड नाईक यांच्या संकल्पनेतुन जिंतूर मध्ये हा महोत्सव सलग दुसऱ्या वर्षी घेण्यात आला.

ज्यामध्ये सलग दहा दिवस विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले होते . अस्मि मेकअप आर्टिस्ट च्या वतीने होम मिनिस्टर खेळ पैठणी जिंकण्याचा, तर ऍड. विनोद राठोड नाईक, केशव चव्हाण आणि रोहित चव्हाण यांच्या वतीने संगीत खुर्चीच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.त्याचबरोबर महिलांची दहीहंडीची स्पर्धा देखील उत्कृष्ट पद्धतीने राबवण्यात आली.

काल रविवारी रोजी या सोहळ्याची सांगता करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन जिंतूर शहरातील माऊली मंगल कार्यालयात करण्यात आलेली होती. आमदार मेघना दीदी साकोरे-बोर्डीकर यांनी बंजारा समाजाच्या वेशभूषेमध्ये यावर्षी देखील पारंपारिक गाण्यावर महिला समवेत नृत्या करून समाज बांधवांची मन जिंकून घेतली. त्यावेळी व्यासपीठावर आ. मेघनादीदी साकोरे बोर्डीकर यांच्या समवेत अँड. विनोद राठोड नाईक सुंदरनाईक चव्हाण, श्रीरंग राठोड,मुकुंदराव चव्हाण, उत्तमराव जाधव, रामभाऊ जाधव, पांडुरंग आडे,सुधाकर जाधव, संतोष राठोड, विकास जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. भाषणाच्या वेळी अँड.विनोद राठोड नाईक यांनी तिजचे महत्व सांगितले. तसेच जिंतूर सेलू चे माजी आमदार माननीय आ. रामप्रसाद बोर्डीकर साहेब आणि आ. मेघना दीदी साकोरे बोर्डीकर यांनी बंजारा समाजासाठी केलेली अनेक कामे केल्याचे सांगितले. तसेच जिंतूर शहरातील स्व.वसंतरावजी नाईक साहेबांचा पुतळा देखील बोर्डीकर साहेबांच्या काळातच उभारण्यात आल्याची आठवण देखील करून दिली. मागील काळात जसा बंजारा समाज मोठ्या संख्येने बोर्डीकर परिवारासमवेत होता तसाच यापुढे देखील राहणार असल्याचे सांगितले.

भाषणादरम्यान आमदार मेघना दीदी साकोरे यांनी भाजपा सरकारच्या काळात झालेल्या विविध योजना तसेच मतदार संघातील नागरिकांना अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्याच्या देखील व आमदार दीदींच्या भाषणातून झाला. सर्व समाजाच्या पाठिंबामुळे मी आणि माझे वडील आमदार झालोच परंतु त्यामध्ये बंजारा समाजाचा खूप मोठा वाटा असल्याचे बोलताना दीदींनी सांगितले. त्याचबरोबर समाजासाठी मी आणि बोर्डीकर कुटुंबीय यापूर्वीही कमी पडलो नाही आणि आजही समाजासाठी आम्ही काम करत असून भविष्यात देखील समाजाकडे कधीही दुर्लक्ष करणार नसल्याचे ठणकावून सांगितले.

भाजपा सरकारच्या वतीने वसंतराव नाईक तांडा वस्ती सुधार योजना तसेच संत सेवालाल महाराज ग्राम समृद्धी योजना मुळे समाजाची अनेक कामे करण्यात येतील असे देखील आमदार दिली भाषणादरम्यान सांगितले. या कार्यक्रमाच्या वेळी एक्ट्रेस पूजा राठोड यांचा डान्स परफॉर्मन्स देखील करण्यात आला. त्यांच्या डान्समुळे देखील कार्यक्रमाचे शोभा वाढली. या कार्यक्रमाचे वेळी सर्व सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, जिंतूर कृउबा. समितीचे पदाधिकारी त्याचबरोबर समाजातील सर्वप्रमुख नेते, कार्यकर्ते, तरुण-तरुणी, वृद्ध शेतकरी, मजूर देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढच्या वर्षीचा कार्यक्रम हा जिंतूरशहरा नजदीक समाजाच्या हक्काच्या जागेवर होईल अशा आश्वासन देखील आमदार दीदींनी सर्वांना दिले. शिवाजी राठोड महाराज यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विलास चव्हाण, संतोष चव्हाण, सतीश राठोड,राहुल पवार, पप्पू जाधव, विजय जाधव ,आकाश राठोड, रोहित चव्हाण, केशव चव्हाण, प्रशांत राठोड, सुजित राठोड, बबलू राठोड, रमेश चव्हाण, सचिन राठोड, रोहन जाधव रोहन चव्हाण, नरेश चव्हाण, शैलेश राठोड नितीन चव्हाण अभिषेक राठोड, कांचन राठोड पंकज चव्हाण, बिट्टू राठोड,साई चव्हाण तसेच शहरातील महिला वर्गाने देखील दहा दिवसाच्या कार्यक्रमासाठी मेहनत घेतली.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

गौरी-गणपती उत्सवाच्या निमित्ताने बीडच्या बाजारपेठा सजावटीसाठी सज्ज

(छाया-कृष्णा शिंदे,बीड)

तभा वृत्तसेवा
बीड दि.४ सप्टेंबर

विघ्नहर्त्या गणरायाबरोबरच गौरी महालक्ष्मीच्या आगमनास अवघे काही दिवस शिल्लक असताना गौरीचे मुखवटे व पूजेच्या साहित्याने बाजारपेठ सजली आहे. गौरी गणपतीचा सण जवळ आला की गृहिणींची विविध वस्तूंच्या खरेदीसाठी लगबग सुरू होते. यंदा गौरी-गणपती उत्सवासाठी बाजारात अनेक पर्याय उपलब्ध झाले आहेत. बाजारात विविध प्रकारचे गौरीचे मुखवटे ग्राहकांचे लक्ष वेधून घेत असून यामध्ये 'अमरावती पॅटर्न'च्या खळी असलेल्या मुखवट्यांना ग्राहकांकडून मोठी पसंती मिळत आहे.

तीन दिवस चालणाऱ्या गौरीच्या सणाला मोठे महत्त्व आहे. प्रत्येक घरात भाद्रपद महिन्यामध्ये

गौरीचे आगमन होते. ज्यांच्या घरात नवीन सून आली आहे ते कुटुंब गौरीसाठी लागणारे सर्व साहित्य पुन्हा नव्याने खरेदी करत असते. गौरीचे मुखवटे, गौरीचे दागिने, गौरी बसवण्यासाठीचे स्टॅण्ड या सर्व साहित्याची बाजारपेठेत जोरदार खरेदी सुरू आहे. अवघ्या आठ दिवसांवर गौरी-गणपतीचा सण येऊन ठेपला असून बाजारपेठ सजली आहे. सण-उत्सवांत सर्वात जास्त महत्त्व असते ते सजावटीला. त्यामुळेच गणेशाच्या मूर्ती, महालक्ष्मीचे मुखवटे यांच्या इतकीच मागणी सजावटीच्या साहित्यालाही दिसून येत आहे.गणपती आणि महालक्ष्मीला लागणारे वेगवेगळे हार, मुकुट, पूजेचे आकर्षक सामान, वेगवेगळ्या प्रकारचे मखर, विविध प्रकारची तोरणे अशा विविधरंगी वस्तूंनी बाजारपेठ फुलून गेली आहे.

सजावटीला थर्माकोलऐवजी हॅण्डमेड मखर

मखराला विशेष मागणी असल्याचे दिसून येते. यामध्ये मंदिर, कमळ, सिंहासन असे विविध आकार उपलब्ध आहेत. महालक्ष्मीसाठी कापडी मखरांमध्ये विविध प्रकार पाहायला मिळतात. गौरी-गणपतीसाठीचे अनेक आकर्षक दागिनेही महिला वर्गाला खुणावत आहेत. मोत्यांचे, फुलांचे हार, लक्ष्मीहार, ठुशी, मोहनमाळ, मोतिहार, कंबरपट्टे, पुणेरी नथ याशिवाय महालक्ष्मीच्या साड्या, कपडे यांचे

महालक्ष्मीचा संपूर्ण सेट ४० हजारांपर्यंत

बाजारात सुंदर आणि आकर्षक असे महालक्ष्मीच्या मुखवट्यांचे प्रकार उपलब्ध आहेत. यामध्ये शाडू मातीच्या अमरावती पॅटर्नची गालावर खळी असलेले मुखवटे तीन हजार रुपयांपासून आहेत तर त्यासोबत कोथळी, हात, फायबर साचा, पिलवंडं, साडी, दागिने असा पूर्ण सेट जवळपास चाळीस हजार रुपयापर्यंत उपलब्ध आहे. तसेच देवसेना पॅटर्न, टोप असलेले मुखवटे उपलब्ध आहेत. यामध्ये पितळी मुखवट्यांची किमत चार हजारांपासून ते दहा हजारांपर्यंत आहे.

नानाजी देशमुख विद्या मंदिरमध्ये गणपती कार्यशाळा

तभा वृत्तसेवा
बीड दि.४ सप्टेंबर

दीनदयाल शोध संस्थान संचलित ,नानाजी देशमुख विद्यामंदिर बीड येथे गणपती कार्यशाळेचे रोटरी क्लब ऑफ बीड मिड टाउन च्या वतीने आयोजन करण्यात आले होते. ही कार्यशाळा दुपारच्या सत्रामध्ये अगदी उत्साहात ३ सप्टेंबर मंगळवार रोजी पार पडली. यामध्ये इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता. यामध्ये विद्यार्थ्यांना शाडूच्या मातीपासून गणपती तयार करणे हे शिकवण्यात आले. विद्यार्थ्यांनी उत्साहामध्ये खूप सुंदर रित्या गणपतीच्या मूर्ती बनवल्या त्या मूर्ती बनवण्यासाठी राजेंद्र गाडेकर सर , संगीताताई मनसबदार, निलेश जगदाळे सर, नितीन जी गोपन सर तसेच राजेंद्र गाडेकर सर यांची कन्या रजनी गाडेकर या सर्वांनी विद्यार्थ्यांना गणपती तयार करण्यासाठी मार्गदर्शन केले. प्रत्यक्षरीत्या समोर बसून गणपतीची मूर्ती तयार करून दाखवली आणि विद्यार्थ्यांना तशी कृती

करण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्यात भर पडली आणि विद्यार्थ्यांनी लोभसपणे, एकाग्रचित्ताने आणि आवडीने स्वतःच्या कल्पना वापरून गणपतीची मूर्ती बनवण्याचा एक खूप सुंदर प्रयत्न केला. त्यातून त्यांना आनंद तर मिळालाच परंतु आपली संस्कृती किती सुंदर रित्या आपण जपली आहे हे या उपक्रमातून दिसून आले आहे.

तसेच या कार्यक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ बीड मिड डाऊन चे अध्यक्ष मा. श्री नितीनजी गोपन सर, रोटरी क्लबचे सचिव मा.डॉ.निलेश जगदाळे, बोर्ड डायरेक्टरची सदस्य तसेच प्रोजेक्टचे चेअरमन प्रा. राजेंद्र गाडेकर, सौ संगीताताई मनसबदार, कु. रजनी राजेंद्र गाडेकर, जन शिक्षण संस्थांचे संचालक मा. श्री.गंगाधर देशमुख सर, शालेय समिती सचिव मा. श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी, तसेच नानाजी देशमुख विद्यामंदिरच्या प्रभारी मुख्याध्यापिका मा. अर्चनाताई मोराळे हे सर्वजण कार्यशाळेसाठी आवर्जून उपस्थित होते. ही कार्यशाळा पार पाडण्यासाठी सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ . जयश्रीताई देशपांडे यांनी केले आणि अगदी उत्साहामध्ये ही कार्यशाळा पार पडली.

राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये आज माजी विद्यार्थी व पालक मेळाव्याचे आयोजन

तभा वृत्तसेवा
किल्लेधारूर दि.४ सप्टेंबर

किल्ले धारूर ०५ सप्टेंबर रोजी राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये गुरुवार दिनांक ५ सप्टेंबर रोजी सकाळी ठीक अकरा वाजता महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये माजी विद्यार्थी व पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या माजी विद्यार्थी व पालक मेळाव्यामध्ये मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तथा महाविद्यालय विकास समिती प्रमुख श्री. जयसिंग धैर्यशील सोळंके उपस्थित राहून माजी विद्यार्थ्यांना व पालकांना संबोधित करणार आहेत. तसेच महाविद्यालय विकास समिती सदस्य श्री. लोभाजी चव्हाण, श्री. अजयसिंह दिख्खत, महाविद्यालय विकास समिती निमंत्रित सदस्य श्री. इंद्रजीत जाधव, डॉ. राम शिनगारे हे उपस्थित राहणार आहेत. या माजी विद्यार्थी व पालक मेळाव्यासाठी धारूर शहर व परिसरातील पालकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर व माजी विद्यार्थी पालक मेळावा समन्वयक डॉ. नितीन कुंभार यांनी केले आहे. या माजी विद्यार्थी व पालक मेळाव्याच्या माध्यमातून पालकांनी पाल्यांच्या सबंधी असलेल्या विविध अडी-अडचणी तसेच महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या संबंधीची माहिती पालकांना होणार आहे. या मेळाव्यामध्ये माजी विद्यार्थी व पालकांनी हिरीरीने सहभागी होऊन उस्फूर्तपणे प्रतिसाद द्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

शाळा व्यवस्थापन समितीच्या अधिकाराला तिलांजली!

तभा वृत्तसेवा
बीड दि.४ सप्टेंबर

केज तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हनुमानवस्ती या शाळेत फेब्रुवारी-२०२४ रोजी शालेय पोषण आहार, कामगार मदतणीस सुमित्रा चौरे यांनी मदतणीस पदाचा राजीनामा दोन पंचासमक्ष शाळा व्यवस्थापम समिती, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हनुमानवस्ती यांचेकडे सादर केल्यानंतर समितीने तो बैठकीत बहुमताने मंजूर करून,नविन मदतणीस म्हणुन सारुक या महीलेची नियमा प्रमाणे नियुक्ती करून गट साधन कार्यालय,केज यांना समितीने तसा प्रस्ताव सादर केला असुन ही व्यस्थापण समीतीच्या अधिकाराला गटसाधन केंद्राच्या अधिका-यांनी घो दाखवुन फेब्रुवारी-२०२४ ते सप्टेंम्बर-२०२४ दरम्यान शालेय पोषण आहाराचे मानधन प्रत्यक्ष काम करणा-या दिपाली सारूक यांच्या नावाने मुख्याध्यापकाने बील सादर करुनही राजकीय दबावापोटी सहा महीन्यापुर्वी राजीनामा दिलेल्या सुमीत्रा चौरे या महीलेच्या खात्यावर पाठविले आहे.काम करणाऱ्या महिलेने जिल्हाधिकारी बीड यांना मामधन बँक खात्यात जमा नझाल्यास कुटूंबासह अमरण उपोषनास बसण्याचे निवेदन दिले आहे.

आयकॉन स्कूल स्केटिंग अकॅडमीच्या खेळाडूंचे शालेय स्पर्धेमध्ये यश

तभा वृत्तसेवा
बीड दि.४ सप्टेंबर

जिल्हा क्रीडा संकुल बीड येथे शालेय रोलर स्केटिंग स्पर्धा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड यांच्या दिनांक ३० ऑगस्ट रोजी वतीने घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये जिल्हाभरातून विविध शाळेच्या खेळाडूंनी सहभाग नोंदविला होता. या स्पर्धा ११,१४,१७,१९ वर्षातील मुले-मुली कॉड आणि इनलाईन प्रकारात घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये अकरा वर्षातील कॉड स्केटिंग प्रकारामध्ये श्री बिरू चौरे या खेळाडूने अतिशय उत्कृष्ट अशी कामगिरी करत द्वितीय क्रमांक मिळवली आहे. तसेच इनलाईन प्रकारामध्ये धनुष धनंजय सुरवसे द्वितीय क्रमांक मिळवून

यश संपादन केले आहे. या खेळाडूंना प्रशिक्षक विशाल गिरी, सुधीर हजारे यांचे मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल आयकॉन स्कूलचे संचालक दीपक घुमरे, शाळेच्या मुख्याध्यापिका पिंकी अग्रवाल, क्रीडा शिक्षकआणि पालकांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.

श्री बंकटस्वामी महाविद्यालयाचा ग्रीन क्लब राज्य शासनाच्या पुरस्काराने सन्मानित

तभा वृत्तसेवा
बीड दि.४ सप्टेंबर

येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयाला महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग व युवकांच्या (धींहि डींवशपीी)मार्फत नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण व पाण्याची बचत हे अभियान राबविले जात आहे.राज्यातील निवडक तेरा जिल्ह्यामध्ये या अभियानाची सुरुवात शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ मध्ये करण्यात आली होती.यामध्ये पाण्याची बचत अभियानांतर्गत ग्रीन क्लब स्थापन करून पाणी बचतीच्या उपयोजनासाठी ग्रीन क्लबच्या माध्यमातून सात सहज करण्याजोग्या कृती योजना राबविल्या जात आहेत.

पेठ बीड भागातील दक्षिणमुखी हनुमान टेकडी संस्थान येथे रामदेव बाबा जन्मोत्सव व जम्माजागरणाचे उद्या भव्य आयोजन

भाविकभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

बीड (प्रतिनिधी):- प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी पेठ बीड भागाच्या जुना मोंढा रोड येथील अत्यंत प्राचीण आणि बीड जिल्ह्यातील सर्वात प्रथम प्राणप्रतिष्ठा झालेल्या दक्षिणमुखी हनुमान टेकडी, जुना मोंढा, बीड संस्थानात मागील पाच दशकापूर्वी रामदेव बाबा मूर्तीची स्थापना करण्यात आली. येथे अनेक भाविकभक्त मनोभावे रामदेव बाबांचे दैनंदिन दर्शनासाठी हजेरी लावतात. रामदेवबाबा यांचा जन्मोत्सव भादवा सुदी बीज (२) रोजी राजस्थानातील रामदेवरा येथे साजरा संपन्न होतो म्हणून येथील दक्षिण मुखी हनुमान मंदिरात त्यांचा जन्मोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा होत असतो आणि दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना या पुरातन मंदिरातील रामदेव बाबांनी अनेक भक्तांना विविध प्रसंगातून दृष्टांत दिला असल्याची भावना भाविकात असून जे की त्यांच्या

नवसाला रामदेव बाबाची कृपा झाल्याची अनेकांची भावना आहे.

प्रति वर्षाप्रमाणे रामदेवबाबा मंदिरात उद्या गुरुवार दि. ०५ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी पाच वाजल्यापासून विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सकाळी सहा वाजता बाबांच्या मूर्तीस महाभिषेक तर दुपारी दहा ते बारा दरम्यान रामदेव बाबांच्या जन्मोत्सवानिमित्त संगीत कलावंतांच्या उपस्थितीत भजन संपन्न होणार असून रात्री साडेनऊ पासून शुक्रवारी ब्रह्ममुहूर्तपर्यंत संतोषी माता मंदिर, बीड येथील सभागृहात श्री रामदेव बाबा सत्संग मंडळ बीड यांच्या संगीतमय भजनाची प्रस्तुती होणार आहे. जम्माजागरणाचे* सलग चार वर्षापासून यजमानपद असलेले बाबाची मनोभावे सेवा करणारे श्री. राधेशामजी अमरकुमारजी कासट व समस्त कासट परिवार हे आहेत. तरी सर्व भाविक भक्तांनी गुरुवार दिनांक ०५ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी पाच पासून दिवसभर होणाऱ्या विविध धार्मिक कार्यक्रमास व रात्रीच्या जम्माजागरणास सहपरिवार ,मित्रपरिवारासह उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन विश्वस्त मंडळ श्री दक्षिण मुखी हनुमान टेकडी संस्थान, संतोषी माता मंदिर संस्थान व समस्त भक्तगण यांच्या वतीने करण्यात आले आहे.

इंफन्ट इंडिया प्रकल्प पाली येथे कायदेविषयक जनजागृती शिबीर

तभा वृत्तसेवा
बीड दि.४ सप्टेंबर

प्रत्येकाला चांगले व आनंदी आयुष्य जगता येण्यासाठी जगताना आयुष्याकडे सकारात्मक पद्धतीने बघने गरजेच असल्याचे प्रतिपादन जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड तथा अध्यक्ष जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आनंद यावलकर यांनी किमान समान कार्यक्रम अंतर्गत आजारग्रस्तांसाठी समुपदेशन या विषयांवर बोलतांना म्हणाले.

बुधवारी इंफन्ट इंडिया प्रकल्प, पाली येथे कायदेविषयक जनजागृती शिबीराचे आयोजन करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव जी.जी. सोनी, मानसशास्त्रज्ञ व समुपदेशक महेश तोष्णीवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.सदर कार्यक्रमासाठी मार्गदर्शक म्हणुन श्री तोष्णीवाल यांनी उपस्थितांच्या अडचणी जाणून घेत त्यांना आयुष्याकडे बघण्याचा दृष्टीकोन निराशात्मक न ठेवता सकारात्मक ठेवण्यास सांगितले. त्यांचा आत्मविश्वास व मानसिक स्थिती बळकट व्हावी या विषयांवर समुपदेशन केले. यासोबतच एचआयव्ही ॲक्ट २०१७ याबद्दल देखील माहिती दिली. संबंधीतांना कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा शाळेत येण्यासाठी आडवले जाऊ शकत नाही. सामान्य मानवाप्रमाणेच त्यांना देखील मुक्तपणे जगण्याचा अधिकार आहे. हे सांगत त्यांना आनंदी आयुष्य जगण्यासाठी प्रोत्साहन दिले. संबंधीतांच्या आजाराविषयीची माहिती ही गोपनीय ठेवली जाते. हे देखील समुदेशन करताना सांगितले. नॅको ही संस्था त्यांना कोणत्या प्रकारे मदत करू शकते याबद्दल देखील माहिती दिली.सदरील कार्यक्रमासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे विधीदूत अशोक तांगडे, तत्वशील कांबळे आणि प्रशिक्षणार्थी म्हणून असलेले नॅशनल लॉ युनिव्हर्सिटी, नागपूर येथील विद्यार्थी सुयष आघाव, राजवीर चेमटे आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत
www.daniktarunbharat.com, epaper.daniktarunbharat.com

हिंगोली जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे अडीच लाख हेक्टरवर क्षेत्र बाधित

दहा वर्षीय मुलीसह एकाचा मृत्यू, १०१ जनावरे दगावली

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ सप्टेंबर

गेल्या तीन दिवसापासून जिल्ह्यात सततधार पाऊस सुरु असून, रविवारी एकाच दिवशी १४१.७० मिलीमीटर पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व मंडळाम ध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे. जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे शेतीविषयक नुकसानीबाबत जिल्ह्याचे एकूण पेरणी क्षेत्र ३ लाख ४९ हजार ८५९ हेक्टरपैकी अंदाजे २ लाख ५८ हजार ८९८ हेक्टर शेती पिक नुकसान झालेले आहेत. त्यामुळे जिल्ह्यात नुकसानीचे पंचनामे तातडीने करण्याबाबत सर्व तहसीलदारांना आदेश देण्यात आले आहेत. पंचनामे करुन २ दिवसात माहिती प्राप्त होईल. जिरायत बाधित क्षेत्रासाठी मदत रक्कम प्रति हेक्टर १३ हजार ६०० रुपये असून तीन हेक्टरच्या मर्यादेत देय आहे. बागायत पिकांच्या नुकसानीसाठी २७ हजार रुपये प्रति हेक्टर तर फळपिके पिकांच्या नुकसानीसाठी प्रति हेक्टरी ३६ हजार रुपये तीन हेक्टरच्या मर्यादेत देय असल्याची माहिती जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी दिली आहे.

हिंगोली जिल्ह्यामध्ये रविवारी झालेल्या अतिवृष्टीम ुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून यामध्ये वसमत तालुक्यातील टेंभूर्णी येथील ३८ वर्षीय सुभाष बाबुराव सवंडकर या व्यक्तीचा पाण्यात वाहून गेल्याने मृत्यू झाला आहे. त्यांच्या कुटुंबियांना शासनाच्या नियमाप्रमाणे ४ लाख रुपये अनुदान देण्यात येणार आहे. तसेच वसमत तालुक्यातील पारवा येथील महेश संतोष कदम (२२ वर्षे) यांच्या पायावर वीज पडून जखमी झाला आहे.

तसेच संजय भिमराव ठोंबरे (३३ वर्षे) व कु.चैतन्या शेषराव ठोंबरे (१० वर्षे) रा.सारंगवाडी ता.औंढा नागनाथ हे नाल्याच्या पाण्यात वाहुन गेले होते. त्यापैकी संजय ठोंबरे हे झाडावर सुरक्षितरित्या होते. तर कु. चैतन्या मयत आढळून आली आहे. जिल्ह्यात लहान मोठ्या १०१ पाळीव जनावरांचा मृत्यू झालेले असून पीएम अहवाल प्रतिक्षेत आहेत. जिल्ह्यामध्ये अंशत: पडझड झालेल्या घराची संख्या ६३२ आहे. नुकसानीचे पंचनामे करण्याची कार्यवाही सुरु आहे.

तसेच २१८ नागरिकांना सुरक्षितस्थळी स्थलांतरीत करण्यात आले असून त्यांच्या त्यांच्या भोजन, निवास, इ. व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच पुरात अडकलेल्या ७९ नागरिकांना रेस्कू करुन सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे.

हिंगोली जिल्ह्यात रविवारी दि. १ सप्टेंबर रोजी सर्वत्र मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतीपिकांचे तसेच पशुधनांचे नुकसान झालेले आहे. पावसामुळे शेतीपिकांचे तसेच पशुधनाचे पंचनामे सुरु करण्याचे आदेश संबंधित यंत्रणेस देण्यात आलेले आहेत. तसेच जिल्हा व्यवस्थापन कक्ष सुसज्ज ठेवण्यात आलेला आहे. काही अडचण आल्यास जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

दरम्यान, प्रशासनाच्यावतीने तत्काळ पंचनामे करण्याची मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

कयाधू नदीवरील खरबी भुयारी बोगद्याला विरोध

हिंगोलीच्या हक्काचे एक थेंबही पाणी देणार नाही

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ सप्टेंबर

तालुक्यातील खरबी येथे कयाधू नदीवर बंधारा बांधून ते भूयारी कालव्याच्या माध्यमातून ईसापूर धरणात सोडून सदर पाणी नांदेड जिल्ह्याला वळविण्यात येणार आहे. यासंदर्भात कामाच्या निविदा काढण्यात आल्यानंतर हिंगोली जिल्ह्यातील शेतकरी, सामाजिक कार्यकर्ते तसेच राजकीय नेते आक्रमक झाले असून येथील शासकीय विश्रामगृहात संयोजक तथा माजी खा ॲड शिवाजीराव माने यांच्या आवाहनानंतर बैठक घेण्यात आली. यावेळी हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष बाकी असतांना हिंगोलीचे पाणी नांदेडला वळविण्याचा घाट कदापीही मान्य नसून या खरबी येथील कयाधू नदीवरील बंधारा आणि भुयारी कालव्याला बैठकीत तीव्र विरोध करण्यात आला असून सदरील कामाच्या निविदा रद्द करण्याची मागणी एकमुखाने करण्यात आली.

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ व राज्य शासनाकडून कयाधू नदीवर खरबी येथे बंधारा बांधून भूयारी कालव्यामच्या माध्यमातून ईसापूर धरणात पाणी सोडून ते पाणी नांदेड जिल्ह्याला वळती करणार आहेत. यासाठी दि ३ सप्टेंबर रोजी उर्ध्वपैनगंगा प्रकल्प विभाग क्र ४ च्या कार्यकारी अभियंता कार्यालयाकडून याबाबत निविदा काढण्यात आली असून यामध्ये खरबी वळण बंधारा, खरबी ते ईसापूर जलाशय पाणी वहन प्रणालीचे बांधकाम व अनुषंगिक कामे या नावाने निविदा प्रकाशित करण्यात आलेली असून यासाठी ९९५ कोटी ४१ लाख रूपयांच्या निधीची तरतुद करण्यात आली आहे. ४ सप्टेंबर पासून ते १८ सप्टेंबर पर्यंत निविदा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तर २० सप्टेंबर रोजी निविदा उघडण्यात येणार आहेत.

एकीकडे हिंगोली जिल्ह्याचा १५ हजार सिंचन अनुशेष बाकी असतांना हिंगोलीच्या हक्काचे पाणी नांदेडला जाणार आहे. त्यामुळे कयाधू नदी अडविल्यामुळे हिंगोली जिल्ह्याचा वाळवंट होणार आहे. हा बंधारा झाल्यास खालच्या भागात पाणीच येणार नाही. राज्य शासनाने निवडणुकीच्या तोंडावर नांदेडकरांना खुश करण्यासाठी सदरच्या निविदा काढल्याचा आरोप बैठकीत करण्यात आला. या वळण बंधाऱ्याला हिंगोलीकरांनी तीव्र विरोध केला सापळी धरणाप्रमाणेच खरबी बंधाऱ्यांच्या रूपाने येवू घातलेल्या महाभयावह संकटाला परतवण्यासाठी वज्रमुठ करून आंदोलनाची दिशा बैठकीत ठरविण्यत येणार आहे. दि ५ सप्टेंबर रोजी पाणी प्रश्नावर काम करणाऱ्या जाणकार जलमित्र, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पुढारी, संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक माजी खा ॲड शिवाजीराव माने, माजी आ. गजाननराव घुगे, सापळी धरण संघर्ष समितीचे अध्यक्ष दिलीप चव्हाण, नंदकिशोर तोष्णीवाल यांनी केले आहे.

इडोळीत पर्यावरणपूरक गणेशमुर्ती स्थापनेचा निर्णय

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ सप्टेंबर

येथील जिल्हा परिषद शाळेत शाडूमाती पासून गणपती बनविण्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देण्यात आले. विद्यार्थ्यांसह गावकऱ्यांनी या प्रशिक्षणात अत्यंत उत्साहाने सहभाग घेतला. खेळीमेळीच्या वातावरणात विद्यार्थ्यांनी सुबक गणेशमूर्ती बनवल्या. या पर्यावरणपूरक गणेशमूर्तीची घरोघरी स्थापना करण्याचा निर्णय गावकऱ्यांनी घेतला आहे. याचे स्तरातून कौतुक होत आहे.

तालुक्यातील इडोळी येथे जिल्हा परिषद शाळेच्यावतीने विद्यार्थ्यांसाठी शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्यासाठी कार्यशाळा घेतली. यावेळी शिक्षणाधिकारी संदीप सोनटक्के, चित्रकार दिलीप दारव्हेकर, मुख्याध्यापक आत्माराम जाधव, अशोक देवकर, राजेश्वर पवार, उपसरपंच रामेश्वर टेकाळे, विठ्ठल जाधव, अंकुश पवार यांच्यासह गावकऱ्यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेसाठी मुंबईच्या आय फाऊंडेशनच्या एस आर दळवी यांच्याकडून शाडू माती पुरविण्यात आली.

या कार्यशाळेत इडोळीच्या शाळेतील तसेच परिसरातील काही शाळांमधून सुमारे २७५ विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी चित्रकार दारव्हेकर यांनी विद्यार्थ्यांसह शिक्षक उपस्थित गावकऱ्यांना गणेशमूर्ती तयार करण्यासाठी मार्गदर्शन केले. त्यानुसार सर्वांनीच गणेशमूर्ती तयार केल्या. यावेळी विद्यार्थ्यांकडून मूर्ती तयार करतांना कोणाकडून गणपतीचे पोट मोठे होत तर कुणी तयार केलेल्या गणपतीलची सोंड लांब होऊ लागली. कोणाच्या गणेशमूर्तीचे कानच लहान होत होते मात्र दारव्हेकर यांनी विद्यार्थ्यांना केलेल्या मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांनी आकर्षक गणेशमूर्ती तयार केल्या आहेत. यावेळी उत्कृष्ट गणेशमूर्ती तयार केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले.

दरम्यान, शाळेमध्ये अतिशय आल्हाददायक वातावरणात विद्यार्थ्यांनी गणेशमूर्ती तयार करण्याचा आनंद घेतला. तब्बल तीन तास चाललेल्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या गणेशमूर्तीच घरोघरी स्थापन करून गणेशोत्सव साजरा करण्याचा निर्णय गावकऱ्यांनी घेतला आहे. याशिवाय प्रत्येक घरी विद्यार्थी गणेशमूर्ती जवळील निर्माल्य एकत्र करून त्या माध्यमातून खत तयार करणार असून सदर खत शाळेच्या परिसरातील झाडांसाठी वापरले जाणार आहे.

सिध्देश्वर-गांगलवाडी येथील पूल तत्काळ दुरूस्त करण्याची मागणी, अनेक गावांचा संपर्क तुटला

तभा वृत्तसेवा
औंढा नागनाथ, ४ सप्टेंबर

दोन दिवसापूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील सिध्देश्वर-गांगलवाडी येथील पूल पुराच्या पाण्यात वाहून गेला आहे. त्यामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला असून हा पूल तत्काळ दुरूस्त करावा अशी मागणी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

पुराच्या पाण्यात पूल वाहून गेल्यामुळे या भागातील १५ ते २० गावांचा रहदारीचा रस्ता बंद झाला आहे. ढेगज, वडचूना, नंदगाव, दूरचूना, सिध्देश्वर, गांगलावाडी आदी गावांचा समावेश आहे. रस्ता बंद झाल्यामुळे ग्रामस्थांना समस्यांना सामोरे जावे लागत आहे. सदरील पूल तत्काळ दुरूस्त करावा अशी मागणी अब्दुल हाफीज, मोहन दिपके, विजय दिपके, उग्रसेन नवले, दिपक पोले, राहुल पुंडगे, पवन ठोके, रवी झुंझुर्डे यांनी उपविभागीय अभियंता यांचेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

संक्षिप्त वृत्त

जीवन कला मंदिराच्या भिंतीला पडले तडे

हिंगोली- जलेश्वर तलावाच्या सुशोभिकरणाचे काम सुरू आहे. तलावातील गाळ उपसा उन्हाळ्यात काढण्यात आला आहे. तलावा लगत रस्त्याचे काम केले जात आहे. गवळीपुरा भागातील जीवन कला मंदिराजवळ मोठ्या प्रमाणात पावसाचे व तलावाचे पाणी मुरून भिंतीला मोठे तडे गेले आहेत. १ सप्टेंबरला सर्वत्र मुसळधार पाऊस झाला. हिंगोली गवळीपुरा भागातील जीवन कला मंदिराच्या भिंतीला मोठ्या प्रमाणात तडे पडले असून भितीदायक वातावरण निर्माण झाले आहे. जलेश्वर तलावाचे सुशोभिकर व रस्त्याचे काम या ठिकाणी सुरू आहे. रस्त्याचे काम संथगतीने सुरू असून मुसळधार पाऊस व तलावाचे पाणी मुरल्यामुळे या भिंतीला तडे जाऊन मंदिराखालील सभागृहात मोठ्या प्रमाणात पाणी जमा झाले होते. त्यामुळे प्रशासन व लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष घालावे अशी मागणी भाविकांतून केली जात आहे.

रस्ता दुरूस्त करून देण्याची मागणी

औंढा नागनाथ- जवळा बाजार, पुरजळ, शिरला, नहाद रस्ता खड्डेमय झाला असून साधी दुचाकी वाहन सुद्धा या रस्त्यावर चालवता येत नाही. रस्ता दुरुस्त करण्याचे आणि मजबुतीकरण करून वाहतुकीसाठी योग्य करण्यात यावा. रस्त्याच्या दुरावस्थेमुळे ग्रामस्थांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असून दळणवळणासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. सदरील रस्ता तत्काळ दुरूस्त करून द्यावा अशी मागणी सुंदरराव पाटील शिरला, विठ्ठलराव सातपुते पुरजळ, दत्तराव अंभोरे जवळा बाजार, नवनाथ राव कुऱ्हे यांनी खासदार नागेश पाटील यांना दिले. यावेळी खा नागेश पाटील आष्टीकर यांनी रस्ता दुरुस्ती करून देण्याचे आश्वासन दिले. खासदार औंढा तालुक्यातील अतिवृष्टीमुळे पूरग्रस्त गावांना भेटी देत आढावा घेण्यासाठी येथील विश्रामगृहात थांबले असता निवेदन देऊन रस्ता दुरुस्तीची मागणी करण्यात आली.

मुख्य जलवाहीनी वाहून गेल्यामुळे शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ सप्टेंबर

जिल्ह्यात मागील चार दिवस अतिवृष्टी झाली. दि २ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमध्ये गांगलवाडी-डिग्रस पासून १० किलोमीटर अंतरावरील सिध्दनाथ नदीला पूर आल्यामुळे नदीवरील पूल वाहून गेला. त्यामुळे सदर पुलाजवळील हिंगोली शहराला पाणीपुरवठा करणारी मुख्य जलवाहीनीचे चार ते पाच पाईप अतितीव्र प्रवाहामुळे वाहून गेलेली आहेत. त्यामुळे हिंगोली शहराचा पाणीपुरवठा चार ते पाच दिवस खंडीत होणार आहे. दरम्यान, हिंगोलीचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर यांच्यासह नगर पालिकेचे पथक घटनास्थळी दाखल झाले असून दुरूस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले आहे. पथकाने युध्दपातळीवर काम सुरू केले आहे. दुरूस्तीचे काम पूर्ण होताच शहराला पाणीपुरवठा सुरू होईल तोपर्यंत नागरिकांना पाण्याचा वापर जपून करावा असे आवाहन अरविंद मुंढे यांनी केले आहे.

व्यापारी, व्यावसायिक यांच्या नुकसानीचे पंचनामे करावेत- व्यापारी महासंघ

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ सप्टेंबर

जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टीत जिल्ह्यातील व्यापाऱ्यांच्या नुकसानी बद्दल आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याची मागणी हिंगोली जिल्हा व्यापारी महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांचेकडे केली आहे.

निवेदनात नमूद आहे की दिनांक एक डिसेंबर रोजी हिंगोली जिल्ह्यात अतिवृष्टी झालेली आहे , या अतिवृष्टीमुळे शेती खरडून गेल्याने व त्यावरील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे, पाणी घरात घुसून नागरिकांच्या घरांचे, त्यांतील साहित्य यांचे पण मोठे नुकसान झालेले आहे, त्याचप्रमाणे जिल्ह्यातील अनेक शहरात व गावातील व्यावसायिक व व्यापारी यांच्या दुकानात, गोदामात, व्यवसायाच्या ठिकाणी पाणी शिरल्याने प्रचंड नुकसान झालेले आहे. हिंगोली जिल्ह्यातील नागरिकांना, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिलीच पाहिजेत पण सोबतच व्यापारी, व्यावसायिक यांचे पण मोठे आर्थिक नुकसान झालेले असल्यामुळे त्यांच्या नुकसानीचे पंचनामे पण करण्यात यावेत व व्यापाऱ्यांना पण आर्थिक मदत देण्यात यावी कारण शासन व प्रशासन स्तरावरून व्यापारी, व्यावसायिक यांचे झालेल्या नुकसानी संदर्भात पाहणी करण्यासाठी कोणत्याही सुचना देण्यात आलेल्या नाहीत. सदरचे निवेदन जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांनी स्विकारून व्यापारी व व्यावसायिक यांच्या झालेल्या नुकसानीची पाहणी केली जाईल असे सांगितले. निवेदनावर राज्य उपाध्यक्ष अनिल नैनवाणी, जिल्हाध्यक्ष नंदकिशोर तोष्णीवाल, सुमित चौधरी, संजय देवडा, राजकुमार देशमुख, कैलास काबरा, गजेंद्र बियाणी, प्रशांत सोनी, रवींद्र सोनी, सुरेशअप्पा सराफ, जुबेर मामु चंद्रकांत देशमुख, शुभम मुंदडा, बंटी नागरे, राजु किलचे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

ईस्त्राईलमध्ये बांधकाम, नर्सींग, पॅरामेडीकल क्षेत्रातील युवकांना संधी

तभा वृत्तसेवा
हिंगोली, ४ सप्टेंबर

राज्य शासनाने राज्यातील कुशल बेरोजगार युवक-युवतींना इस्त्राईलमध्ये बांधकाम तसेच नर्सिंग व पॅरामेडिकल क्षेत्रात लाखभर उमेदवारांना रोजगाराची सुवर्णसंधी आहे. याद्वारे युवकांना स्वप्नांची क्षितिजे विस्तारण्याची संधी मिळणार आहे.

बांधकाम क्षेत्रातील फ्रेमवर्क/शटरिंग कारपेंटिंग, लोखंड वाकवणे/बार बेन्डींग (शटरिंग काग), पॉलिश फरशी काम (सिरेमिक टाइल्स), गिलावा काम (प्लास्टरिंग काम) याविषयी कौशल्ययुक्त युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत.

नर्सिंग व पॅरामेडिकल क्षेत्रात वृद्धांची, आजारी व्यक्तींची काळजी व देखभाल घेणे, इंजेक्शन, ड्रेसिंग इ. वैद्यकीय कामाचे कौशल्य व तात्काळ उपचार करण्याबाबतचे कौशल्य असणाऱ्या युवकांना रोजगारांच्या संधी उपलब्ध आहेत.

इच्छूक उमेदवारांसाठी पात्रता इस्राईलमध्ये काम करण्याची इच्छा, उमेदवाराला जुजबी इंग्रजी विषयाचे ज्ञान, क्षेत्रासंबंधी प्राथमिक कौशल्य व प्रमाणपत्र, किमान सहा महिने वैध असणारा पासपोर्ट, किमान शिक्षण अट नाही, वयोमर्यादा २५ ते ४५ वर्षे, कोणताही प्रदीर्घ आजार नसावा. इस्राईल येथे नोकरी मिळविण्यासाठी राज्यातच निवड प्रक्रिया व नोकरीच्या नियुक्तीचे वाटप, आरोग्य विषयक तपासणी, व्हिजा आणि पासपोर्टसाठी संपूर्ण मार्गदर्शन व सहकार्य राज्य शासनामार्फत करण्यात येईल, या प्रक्रियेत निवड झालेल्या उमेदवारास अंदाजित १ लाख ३७ रुपयापर्यंत मासिक वेतनाची संधी व आंतरराष्ट्रीय पातळीवर काम करण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

पुढील टप्प्यात यासह इतर क्षेत्रातील १ लाख कौशल्यधारक व युवतींना केअर गिविंग, नर्सिंग व पॅरामेडिकल क्षेत्रात मोठ्या रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. यासाठी इच्छूक उमेदवारांनी अधिक माहितीसाठी हेल्पलाईन १८००१२०८०४० येथे तात्काळ संपर्क साधावा. तसेच बांधकाम क्षेत्रातील इच्छूकांनी नोंदणी करावी, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त डॉ. राजाभाऊ कोल्हे यांनी केले आहे.

औंढा तहसीलमध्ये आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या अनुदानासाठी बैठक

तभा वृत्तसेवा
औंढा नागनाथ, ४ सप्टेंबर

येथील तहसील कार्यालयात आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या अनुदानाविषयी आढावा बैठक घेण्यात आली या बैठकीत महसूल विभाग कृषी विभाग व पंचायत समितीचे सर्व कृषी सहायक, तलाठी व ग्रामसेवक यांचे आढावा बैठक घेण्यात आली सदर बैठकीच्या अनुषंगाने प्रांताधिकारी विकास माने यांनी बैठकीदरम्यान सर्व कर्मचाऱ्यांशी संवाद साधत असे आदेश दिले की झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक शेतकऱ्यांचे कमी जास्त प्रमाणात सर्वत्र नुकसान झाले असून त्या नुकसानीची पंचनामे तात्काळ करण्यात यावेत व या कामी महसूल मंडळ व कृषी विभाग व पंचायत समिती या तैयसमीतीने पंचनामे करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले

बैठकीमध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीच्या उभ्या पिकांचे व घरपडीचे नुकसान झाले आहे त्या पात्र शेतकऱ्यांना वंचित ठेऊ नका असे निर्देश प्रांताधिकारी विकास माने यांनी दिले तसेच तहसीलदार हरिष गाडे यांनी सुद्धा महत्वाचे सुचना दिल्या. याप्रसंगी गटविकास अधिकारी गोपाल कल्हारे, कृषी अधिकारी पवार, नायब तहसीलदार लता लाखाडे, अनिता कोलगणे, वैजनाथ भालेराव यांच्या सह सर्व कर्मचारी उपस्थित होते. यानतंर प्रांताधिकारी व सर्व विभाग प्रमुखांनी तालुक्यातील जास्त नुकसान झालेल्या गावांमधील पिकांची पाहणी केली.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे नांदेड विमानतळावर स्वागत

तभा वृत्तसेवा
नांदेड , ०४ सप्टेंबर-

महामहिम राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे श्री गुरुगोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे भारतीय वायुसेनेच्या विमानाने सकाळी १०.२५ वाजता आगमन झाले.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी पुष्पगुच्छ देऊन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे स्वागत केले. यावेळी ग्रामविकास, पंचायतराज व पर्यटन मंत्री तथा पालकमंत्री गिरीश महाजन, माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, अतिरिक्त पोलीस महासंचालक कृष्णप्रकाश, जिल्हाधिकारी अभिजित राऊत, पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी आमदार माधवराव पाटील जवळगावकर, आमदार डॉ. तुषार राठोड, आमदार राजेश पवार, कमांडिग ऑफिसर कर्नल एम. रंगाराव आदींची उपस्थिती होती.

विमानतळावरुन राष्ट्रपती महोदया यांनी उदगीर येथील नियोजित कार्यक्रमासाठी १०.३५ वाजता वायुसेनेच्या हेलिकॉप्टरने प्रयाण केले.

भाग्यनगर पोलिसांनी पकडली कत्तलीसाठी जाणारी जनावरे

तभा वृत्तसेवा
नांदेड, ०४ सप्टेंबर-

भाग्यनगर पोलिसांनी कत्तलीसाठी जाणारे गोवंशीय जातीचे १७ बैल जयभवानी चौकाजवळ सापळा रचून पकडले. या कारवाईत पोलिसांनी १७ बैल, एक वाहन असे एकूण २२ लाख ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी जिल्ह्यात फ्लॅश आऊट ऑपरेशन राबविले असून, या ऑपरेशन अंतर्गत भाग्यनगर पोलिसांनी हि कारवाई केली. भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक केजगीर यांना मिळालेल्या गुप्त माहितीवरुन नांदेड-पूर्णा रोडवरील जयभवानी चौकात पोलिसांनी दि.४ सप्टेंबर रोजी सापळा रचून आयचर गाडी क्र.एमएच-२८-बीबी-४९४४ थांबवून पाहणी केली असता या ट्रकमध्ये गोवंशीय जातीचे एकूण १७ जनावरे दिसून आली. या प्रकरणी पोलिसांनी वाहन चालक शेख आयुब शेख युसूफ रा.चौपाल मोहल्ला नशिराबाद जळगाव, गाडीचा हेल्पर फरीद नबी कुरेशी रा.वाघारी जळगाव, शेख मुक्तार शेख अब्बास रा.आयशानगर व बैल मालक शेख अस्लम शेख फकीरा यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु होती. पोलिसांनी आयचर गाडी व १७ बैल असा एकूण २२ लाख ८५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

हि कामगिरी पोलीस निरीक्षक रामदास शेंडगे, गुन्हे शोध पथकाचे पोलीस उपनिरीक्षक के.बी.केजगीर, पोहेकॉ. विशाल माळवे, अदनान पठाण यांनी पार पाडली.

महाविकास आघाडीच्या विरोधात निषेध आंदोलन

तभा वृत्तसेवा
किनवट, ०४ सप्टेंबर-

राजकोट येथील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्या संदर्भात महाविकास आघाडी कडून असुरी राजकारण सुरू असून सतत द्वेष पसरविण्याचे काम करीत आहेत. याचा निषेध म्हणून शिवभक्त व भाजपा युवा मोर्चाच्या वतीने आमदार भीमराव केराम , नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष स्वागत आयनेनिवार यांच्या प्रमुख उपस्थितीत युवा मोर्चा तालुकाध्यक्ष आशुतोष बेद्रे यांच्या नेतृत्वाखाली किनवट येथील छत्रपती शिवाजी महाराज

चौकामध्ये दिनांक १ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता निषेध आंदोलन करण्यात आले. महाविकास आघाडी कडून छत्रपती शिवाजी महाराजांविषयी चुकीची माहिती सांगून शिवप्रेमी बांधवांचे मन दुखवण्याचे काम मोठ्या प्रमाणात केले जात आहे. म्हणून निषेध फलक दाखवून, विविध घोषणा देऊन महाविकास आघाडीच्या नेत्यांचा निषेध करण्यात आला.

यावेळी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, शहराध्यक्ष संतोषराव चनमणवार, विश्वास कोल्हारीकर, बाळकृष्ण कदम, जयराज वर्मा, सतीश बिराजदार, राहुल दरगुलवार,पवन गिरी,पृथ्वीराज ठाकरे, बाबू जाटवे, शिवा क्यातमवार, शिवा आंधळे, बबलू नाईक, सुरेश सकपेल्लीवर,कृष्णा कालकुंटलावार,राज नाईक आदी शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विष्णुपुरी प्रकल्पाचा १८ नंबरचा दरवाजा उघडण्याची मागणी

तभा वृत्तसेवा
नांदेड, ०४ सप्टेंबर-

मागील तीन दिवसापासून पावसाची संततदार सुरू आहे. पाऊस थांबला असला तरी भविष्यात पाऊस पडण्याची शक्यता असल्याने विष्णुपुरी प्रकल्प परिसरातील गावांना होणारा संभाव्य धोका रोखण्यासाठी प्रकल्पाचे १८ नंबरचे गेट उघडण्याची मागणी असर्जन येथील गावकऱ्यांनी केली आहे.

नांदेड जिल्ह्यात मागील तीन दिवसापासून पावसाची सतत दार सुरू आहे. आज पावसाने विश्रांती घेतली असली तरी आगामी काही दिवसात पाऊस पडण्याची शक्यता तसेच जायकवाडी धरणाचे दरवाजे उघडल्यानंतर विष्णुपुरी प्रकल्पात मोठ्या प्रमाणात पाणी येणार असून यामुळे परीसरातील असर्जन गावास होणारा संभाव्य धोका टाळण्यासाठी विष्णुपुरी प्रकल्पाचा १८ नंबरचा दरवाजा उघडून संपूर्ण गाळ काढण्यात यावा अशी मागणी असर्जन येथील नारायण लुटे, संतोष गाडे यांनी केली आहे.

संक्षिप्त वृत्त

प्रो. चव्हाण यांची सायकलिंग 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स' मध्ये नोंद

नवीन नांदेड -स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील जैवशास्त्र संकुलाचे संचालक प्रो. डॉ. शिवाजी चव्हाण यांनी दि. ८ नोव्हेंबर २०२३ ते २३ नोव्हेंबर २०२३ या पंधरा दिवसाच्या कालावधीमध्ये केलेल्या ३००० कि.मी. सायकलिंग प्रवासाची नोंद भारताच्या 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड-२०२४' मध्ये घेण्यात आली आहे. आसाम राज्याची राजधानी गुवाहाटी येथील एल.जी.बी. विमानतळापासून प्रा. चव्हाण यांनी सायकलिंग सुरूवात केली होती. १५ दिवसात ते भारताच्या गुजरात राज्यातील पोरबंदर येथे पोहोचले. अशा प्रकारची एकट्याने व कोणताच आधार न घेता केलेली ही सायकलिंग आतापर्यंत भारतातून कोणीही केलेली नाही. त्यामुळे 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड' ने याची नोंद घेतली आहे. जगातील विविध प्रकारच्या रेकॉर्डसाठी जसे 'गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड' आहे. त्याचप्रमाणे भारतासाठी भारतीयांचे रेकॉर्ड या रेकॉर्डमध्ये नोंदवले जातात. यासाठी 'स्ट्रॅव्हा अँप चा डेटा, गारमीन जीपीएस डेटा, मोबाईल टाईम लाईन डेटा, २५ व्हिडिओ क्लिप, ४० फोटो रेकॉर्ड आणि प्रवासात थांबलेल्या ठिकाणाचे पुरावे या पुरस्कारासाठी तपासले गेले आहे. या पुरस्काराचे स्वरूप गोल्ड मेडल, प्रमाणपत्र, रेकॉर्ड बुकची प्रत व यासंबंधित ओळखपत्र असे आहे. सायकल प्रवास करताना ऊन, वारा, पाऊस, थंडी, धुकं अशा अनेक अडचणींना सामोरे जात दररोज कमीत-कमी २०० कि. मी. सायकलिंग करत त्यांनी भारताच्या पूर्वे कडील आसामच्या दुर्गम भागातून प्रवास सुरू केला होता व भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील पोरबंदर येथे येवून हा प्रवास थांबला. भारताच्या पूर्व-पश्चिम भागांना जोडणारा देशातला दुसऱ्या क्रमांकाचा लांब महामार्ग एनएच-२७ या महामार्गावरून हा प्रवास करण्यात आला होता.'उत्तम आरोग्यासाठी सायकल चालवा' हा संदेश देशातील जन-माणसात पोहोचावा हा या प्रवासामागचा हेतू होता असे प्रो. चव्हाण म्हणाले. जीवनात नवचैतन्य पाहिजे असेल, आजारापासून दूर राहायचं असेल, मरगळ झटकायची असेल व दीर्घायुष्य व्हायचं असेल तर दररोज सायकल चालवावी असेही ते म्हणाले. प्रा. चव्हाण आजही दररोज कमीत-कमी ४५ ते ५० कि.मी. सायकलिंग करतात. आज त्यांच दोन वर्षातील सायकली मीटर रिडींग ३६ हजार कि.मी. एवढं आहे. या त्यांच्या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे, विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठता डॉ. एम.के. पाटील, जनसंपर्क अधिकारी डॉ. अशोक कदम, जैवशास्त्र संकुलातील सहकारी प्रो. टी.ए. कदम, प्रो. बि.एस. सुरवसे, प्रो. एल.एच. कांबळे, प्रो. राजेश टाले यांच्यासह विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांनी अभिनंदन केले.



आशियाई किकबॉक्सींग स्पर्धेसाठी दिपा गवळे यांची निवड

नांदेड-कंबोडिया देशात दि. ७ ते १२ ऑक्टोंबर दरम्यान आशियाई किकबॉक्सींग स्पर्धा होणार असून या स्पर्धेसाठी नांदेड जिल्हा किकबॉक्सींग स्पोर्ट्स असोसिएशनच्या कार्यध्यक्षा दिपा गवळे यांच्या सोबतच त्यांचे विद्यार्थी ऋतीक बंडेवाड आणि कार्तिक राठोड यांचीही आशियाई किकबॉक्सींग स्पर्धेसाठी निवड झाली आहे. विशेष बाब म्हणजे या स्पर्धेकरिता संपूर्ण भारत देशातून ३९ खेळाडूंची निवड झाली असून यामध्ये नांदेड जिल्हातील दिपा गवळे यांच्यासह ३ खेळाडुंचा समावेश आहे. गोवा येथे दि.२४ ते २८ जुलै दरम्यान झालेल्या राष्ट्रीय किकबॉक्सींग स्पर्धेत सूवर्ण पदक प्राप्त केल्यानंतर, कलकत्ता येथे आंतरराष्ट्रीय ट्रेनिंग कॅम्पसाठी निवड झाली होती. त्यामध्ये त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे दिपा गवळे व त्यांचे विद्यार्थी ऋतीक बंडेवाड व कार्तिक राठोड यांची भारतीय संघामध्ये निवड झाली आहे. या खेळाडूंना ब्लेझ कॉम्बॅट अँड फिटनेस क्लब चे संचालक किरण गवळे यांनी उत्कृष्ट प्रशिक्षण देऊन मोलाचे मार्गदर्शन केले व त्यांच्या ह्या मार्गदर्शनामुळेच नांदेड जिल्हाचे खेळांडू आज विदेशात नांदेडचे नाव उज्वल करीत आहेत.

सरसकट शेतकऱ्यांच्या शेतीचे पंचनामे करा; लोहा तालुका काँग्रेस पक्षाची मागणी

लोहा-तालुक्यात अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतीचे विलंब न लावता तात्काळ शासनाने सरसकट पंचनामे करुन शेतकऱ्याला मावेजा द्यावा अशी मागणी काँग्रेस पक्षाने तहसीलदार यांना निवेदन देऊन मागणी केली आहे. संपूर्ण राज्यात मोठ्या प्रमाणात अति वृष्टी झाली आहे त्यामध्ये लोहा तालुक्यात सुध्दा मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होऊन शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे शेतकऱ्यांच्या शेतातील हाताला आलेले सतत पावसामुळे उबळुन गेली यामुळे .शेतकरी चिंता ग्रस्त झाला आहे .या काळात सरकारने शेतकऱ्याला धिर देणे गरजेचे आहे. शेतात तळ्यासारख्या झाले आहे सरकारने विलंब न लावता सरसकट पंचनामे करून नुकसान ग्रस्त शेतकऱ्याला तात्काळ मावेजा द्यावा अशी मागणी तहसीलदार यांना निवेदन देऊन तालुका काँग्रेस पक्षाने मागणी केली आहे यावेळी काँग्रेस तालूका अध्यक्ष शरद पाटील पवार ,भास्कर पाटील जोमेगावकर, उध्दव पाटील ढेपे ,अकबर सय्यद बेरळीकर,प्रकाश मोरे,माधव पाटील ,चॉद पटेल काबेगावकर,दिंगाबर मेकाले यांची उपस्थिती होती.

मुखेड - हिब्बट - देगलुर रस्त्याचा प्रश्न लोकप्रतिनिधींना सुटेना

तभा वृत्तसेवा
मुखेड, ०४ सप्टेंबर-

मुखेड तालुक्यात सध्या राजकीय वातावरण तापलेले दिसुन येते आहे. मुखेड विधानसभा मतदारसंघावर अनेक भावी आमदारांनी दावा केलेला आहे. खंडीभर भावी आमदार गुडघ्याला बाशिंग बांधून शहरात तळ ठोकुन बसले आहेत. भावी आमदारांनी भाजपाच्या विद्यमान आमदारांना आव्हान देत आम्ही एमआयडीसी, बायपास, रेल्वे लाईन, लेंढी प्रकल्प,मेट्रो रेल्वे सारखे मातभर आश्वासनं देऊन मतदारांना भुरळ घातली आहेत. मागील १० वर्षांपासून केंद्रात तर ८ वर्षे राज्यात सत्तेवर आलेल्या भाजपाच्या विद्यमान लोकप्रतिनिधीना डांबरी रस्ते, सिमेंट रस्ते ,गटूचा रोड,

स्मशानभूमी यापुढे काही सुचलंच नाही की काय अशीच परिस्थिती आहे. तर महामार्गांना मंजुरी अणल्याची श्रेय घेण्यापलीकडे यांच्याकडे आता उरलयच काय ?. हि वस्तुस्थिती आहे.

मुखेड ते देगलुर जोडला जाणारा मुख्य आणि जवळच्या रोड म्हणून ओळखले जाणाऱ्यां मुखेड - हिब्बट - एकलारा - खानापूर मार्ग देगलुर हे रोड २०१९ पासुन बाधीत शेतकऱ्यांनी जमिनीचा मावेजा मिळावा यासाठी शासनाकडे मावेजा मिळाल्या नंतरच काम सुरू करा म्हणून सदरील काम बंद केले आहे. या रोडवरून एकलारा, धनज, जामखेड, नांदगाव, आडलुर, हिब्बट मोटरगा, माऊली, उच्चा, केरूर, तांदळी, बोरगाव या गावातील विद्यार्थी, महिला, वयोवृद्ध प्रवासी प्रवास करतात. उखडुन सोडलेल्या अत्यंत खराब रस्त्यांमुळे गेल्या ५ वर्षांपासून या प्रवासी नागरिकांना महामंडळाच्या लालपरीसह इतर वाहणाच दर्शनच नाही परिणामी या मार्गावरील प्रवाशांना अक्षरशः चालत जावे लागते आहे.या नागरिकांनाच्या व शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सरकार व विद्यमान लोकप्रतिनिधीना कसलेही तमा नसावी हे मात्र शोकांतिका आहे. विद्यमान लोकप्रतिनिधीना लेंडी प्रश्नांबाबत मुंबईत विशेष बैठक लावली पण हिब्बट रोडवरील शेतकऱ्यांसाठी बर शब्द बोलायला वेळ नाही किंवा शेतकऱ्यांसोबत संवाद साधता येत नाही ? अशा प्रश्न शेतकऱ्यांतुन निर्माण होत आहे. तर या मार्गावरील लोकांनी विद्यमान लोकप्रतिनिधीना मतदान केले नाही का. ? असा सवाल नागरिक विचारत आहेत. नुकतेच संपन्न झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत या भागातील नागरिकांनी विद्यमान सरकारच्या व लोकप्रतिनिधींच्या कारभारावर नाराजी व्यक्त करत सत्ताधारींना् नापसंती दाखवली होती हिच परिस्थिती होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत विद्यमान लोकप्रतिनिधीना रोषाला सामोरे जावे लागणार असल्याची प्रतिक्रिया या भागातील नागरिकांनी दैनिक तरुण भारत च्या प्रतिनिधींशी बोलताना व्यक्त केल्या आहेत.

अर्धापूर तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करा; मुख्यमंत्र्याकडे मागणी

तभा वृत्तसेवा
अर्धापूर, ०४ सप्टेंबर-

तालुक्यात सलग तीन दिवस ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. या पावसाने नदी - नाल्यांना प्रचंड पूर येवून पुराचे पाणी शेतात शिरल्याने संपूर्ण पिके पाण्याखाली गेली आहेत. यातून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या नुकसानीची पाहणी करून तात्काळ मदत द्यावी. तसेच संपूर्ण अर्धापूर तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा. अशी मागणी दि. ४ सप्टेंबर रोजी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना तहसीलदार अर्धापूर यांच्या मार्फत व्हॉईस ऑफ

मीडिया अर्धापूर तालुका पत्रकार संघटनेच्या वतीने करण्यात आली.

अर्धापूर तालुक्यातील अर्धापूर, मालेगांव आणि दाभड या तीन महसूल मंडळात शनिवार, रविवार, सोमवार या तीन दिवसात ढगफुटी सदृश्य पाऊस झाला. या सततच्या पावसामुळे खरीप हंगामातील कापूस, सोयाबीन, तुर, मुग आदी पिकांचे कोट्यावधी रूपयांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे येथील शेतकरी हवालदिल झाला आहे. प्रशासनाकडून या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करुन शेतकऱ्यांना अर्थिक मदत द्यावी. तसेच तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करुन दुष्काळीचे नियम तात्काळ लागू करा. अशा मागणीचे लेखी निवेदन राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना तहसीलदार अर्धापूर यांच्या मार्फत व्हॉईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेच्या वतीने देण्यात आले. या निवेदनावर पत्रकार संघटनेचे राज्य संघटक नागोराव भांगे पाटील, ज्येष्ठ पत्रकार रामराव भालेराव, तालुकाध्यक्ष गोविंद टेकाळे, कार्याध्यक्ष डिगांबर मोळके, उपाध्यक्ष छगनराव इंगळे, शेख साबेर, सचिव इरफान पठाण, अनिल मोळके आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दत्त शिखर संस्थान येथे ऋषीपंचमी सोहळा

माहुर-प.पु. बळीराम भारती गुरु राम भारती महाराज यांच्या पुण्यतिथी निमित्य भाद्रपद शु. ऋषीपंचमी सोहळा रविवार दिनांक ०८ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आला आहे. सर्व आदरणीय संत, महंत, मठाधिपती, गुरुवर्य, गुरुबंधू, सेवेकरी तसेच शिष्यगण यांना सादर आमंत्रित करण्यात आले असल्याचे निमंत्रण पत्रिकेद्वारे निमंत्रक वासुदेव भारती गुरु बळीराम भारती मुख्य पुजारी श्री दत्त शिखर संस्थान, माहूरगड यांनी कळविले आहे.

नांदेड -राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे श्री गुरुगोविंद सिंघजी विमानतळ नांदेड येथे सकाळी विमानाने आगमन झाले. राज्याचे ग्रामविकास, पंचायतराज व पर्यटन मंत्री तथा पालकमंत्री गिरीश महाजन व माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांना पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

वझरगा येथील शाळा खोलीचे बांधकाम निकृष्ट

तभा वृत्तसेवा
देगलूर, ०४ सप्टेंबर-

वझरगा ता. देगलूर येथील शैक्षणिक मंदिर समजल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद शाळेचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याची तक्रार सामाजिक कार्यकर्ते माणिक सूर्यवंशी यांनी कार्यकारी अभियंता जिल्हा परिषद नांदेड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. दोन खोली शाळेच्या बांधकामात अत्यंत निकृष्टता होत असल्याबाबतचे सज्जड पुरावे माणिक सूर्यवंशी यांनी एकत्रित करून देगलूर येथील जिल्हा परिषद बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता यांच्याकडे तक्रार दिली होती. मात्र संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे जाणून बुजून अर्थपूर्ण दुर्लक्ष करून तक्रारीस केराची टोपली दाखवली.

सदरील दोन खोली शाळेचे बांधकाम हे डीपीडीसी अंतर्गत होत असून सामाजिक कार्यकर्ते माणिक सूर्यवंशी यांनी काम चालू असतानाच निकृष्टते बाबतचे पुरावे संबंधितांना कळवली होती. ज्ञानदानाच्या या मंदिरात कदापी भ्रष्टाचार होऊ देणार नाही म्हणून माणिक सूर्यवंशी यांनी संबंधित कामाची तक्रार वरिष्ठांकडे दिली. खरे पाहता वरिष्ठांनी ज्ञानदानाच्या मंदिरात होणाऱ्या या भ्रष्टाचाराच्या विरोधात कठोर पावले उचलायला हवी होती अशी भावना माणिक सूर्यवंशी यांनी व्यक्त केली. मात्र कोणतीच कठोर पावले उचलली गेली नसल्याने सूर्यवंशी यांनी थेट नांदेड गाठून कार्यकारी अभियंता नांदेड यांच्याकडे तक्रार दिली ज्यामध्ये दोषपूर्ण कार्य करणारे

संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर दप्तर दिरंगाई कायदा २००६ कलम १० व उपकलम १,२,३ नुसार शिस्तभंगाची कारवाई करावी व बोगस काम करणाऱ्या कंत्राटदाराला काळ्य यादीत टाकून यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते माणिक सूर्यवंशी यांनी नांदेड जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता नांदेड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

काँग्रेसचा बैलपोळा..नवचैतन्याचा सोहळा..! सर्वधर्म समभावाचा संदेश

तभा वृत्तसेवा
मुदखेड, ०४ सप्टेंबर-

मुदखेड शहरात युवक काँग्रेसच्या वतीने गेल्या तेरा वर्षापासून सुदृढ बैल जोडी व शेतकऱ्यांचा गौरव सोहळा साजरा करण्याची परंपरा अजूनही कायम असून सर्वधर्म समभावाचा संदेश देत नवचैतन्याचा सोहळा ठरला आहे.

भारतीय संस्कृतीत शेतकऱ्यांसाठी बैलपोळा हा सण सर्वात महत्त्वाचा समजला जातो. कबाड कष्ट करणाऱ्या शेतकऱ्यांना तसेच मानेवर जीवाचे ओझे वाहत कुटुंबाच्या उदरनिर्वाहात मोलाचा वाटा असनाऱ्या बैल राजा तसेच बळीराजाचा गौरव सोहळा झाला पाहिजे ही संकल्पना युवक काँग्रेसने अमलात आणली. कोरोनाच्या दोन वर्षाच्या काळातील खंडानंतर पुन्हा बैलपोळा व गौरव सोहळा जोमात व उत्साहात सुरू करण्याचा निर्णय युवक काँग्रेसचे गिरीश कोतावार, गजानन संबोड, राधेश्याम ढगे, एडवोकेट माणिक पचंलिंग, , यांच्या पुढाकारातून यावर्षी सुरू करण्यात आला.हनुमान मंदिरात सोहळा आयोजित करण्यात येऊन सर्व बैल जोड्यांचे सामूहिकरीत्या उभे करून त्यातील सुदृढ बैल जोडी निवडीसाठी समिती नेमण्यात आली होती. या समितीत वैजनाथ भालेराव, सदाशिव मोरे, गंगाधर राजेवाड, रामचंद्र शेटे, देविदास चंद्रे यांचा समावेश होता.

बैलपोळा निमित्त काँग्रेसच्या वतीने पाच आकर्षक बक्षिसांसह प्रोत्सांहपर बक्षीस ठेवण्यात आले होते. यामध्ये प्रथम पारितोषिक सात हजार एकशे आकरा, द्वितीय पारितोषिक पाच हजार एकशे आकरा रुपये, तृतीय पारितोषिक ३१११रुपये, चतुर्थ पारितोषिक २१११ रुपये, पाचवे पारितोषिक पंधराशे आकरा व प्रोत्साहन पर अकराशे आकरा रुपये ठेवण्यात आले होते. पारितोषिक निवडीच्या निकषात सुदृढ बैल, रंगरंगोटी

सजावट यास प्राधान्य देण्यात आले होते. यामध्ये शहरातील जवळपास २०० च्या वर बैलजोडींनी सहभाग घेतला होता.

सुदृढ बैलजोडी च्या प्रथम पारितोषिकेचा मान गजानन चौधरी यांच्या बैलजोडीस मिळाला आहे. द्वितीय पारितोषिक वैजनाथ पचलिंग, तृतीय पारितोषिक बाळू चंद्रे, चतुर्थ पारितोषिक भुजंग फुले, पाचवे पारितोषिक माधव आऊलवार यांच्या बैलजोडीस मिळाले आहे. प्रोत्साहन पर पारितोषिक भाजपचे समन्वयक संजय आऊलवार यांच्या बैलजोडीस मिळाले. काँग्रेसच्या वतीने तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख बारडकर, शहराध्यक्ष कैलास गोडसे, युवा काँग्रेसचे गजानन संबोड, गिरीश कोतावार, राधेश्याम ढगे, महाराजा डेअरी, शिवानंद देवके यांच्या वतीने बक्षीस ठेवण्यात आली होती. सुदृढ बैलजोडींना काँग्रेसचे केशवराव कदम, करीम खान साहब, शंकर राठी, खलील कुरेशी, महावीर कंधारकर,सुधाकर आडकीने, प्रताप देशमुख कैलास गोडसे, अतिक अहमद, शिवसेना शहर प्रमुख सचिन चंद्रे यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. यासोबतच शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. या उपक्रमाने शेतकऱ्यात नवचैतन्याचे वातावरण पसरले आहे. काँग्रेसच्या वतीने सर्वधर्मसमभावाचा संदेशही देण्यात आला.या उपक्रमासाठी गिरीश कोत्तावार, राधेश्याम ढगे, गजानन संबोड ,सुरेश ढगे,माणीक पचंलीग, शिवानंद देवके, शिवा तरोडकर, मोईन खान, महेश गोदनगावे ,वेदांत शेवटे यांच्यासह आदींनी पुढाकार घेतला होता. यावेळी , रमेश बोडके, संदेश वाघमारे, राजण वडे, शिरीष श्रीरामवार, लतीफ टेलर, माध्यम समूहाचे अध्यक्ष सिद्धार्थ चौदांते, अब्दुल रझाक, ईश्वर पिनलवार, शेख जब्बार,यांच्यासहशेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.